बैल पोळा

विदर्भ प्रजासत्ताक

बैल पोळा

RNI No. - MAHMAR 2023/84526

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.२ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -८

जातीय जनगणनेवर संघाने स्पष्ट केली भूमिका; 'एकता आणि अखंडता धोक्यात

महिलांच्या सुरक्षेसाठी नव्याने पाऊले उचलण्याचा दिला सल्ला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ नागपूर

एकीकडे भाजपा जातीय जनगणनेच्या विरोधात असताना, त्यावर काहीच बोलत नसताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. समाजातील एकता आणि अखंडता कायम ठेवण्यासाठी जातीय जनगणनेबाबत चिंता व्यक्त केली आहे. तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी नव्याने पाऊले उचलण्याचा सल्ला दिला आहे.

या दोन्ही विषयांवर आरएसएसची एक बैठक झाली. यावेळच्या चर्चेत अनेक विषय

घेण्यात आले तसेच भविष्याबाबतही काही निर्णय घेण्यात आले आहेत. जात जनगणनेमुळे समाजाची एकता आणि अखंडता धोक्यात येऊ शकते, अशी भुमिका संघाने मांडली आहे. यामुळे यापासून वाचण्यासाठी जनस्तरावर एकोपा वाढवण्यासाठी काम केले जाईल, असे ठरविण्यात आले आहे.

जातीवर आधारित मोजणी हा समाजातील संवेदनशील मुद्दा आहे. तसेच राष्ट्रीय एकतेसाठीदेखील महत्वाचा आहे. याचा उपयोग प्रचारासाठी किंवा निवडणुकीसाठी केला जाऊ नये. कल्याणकारी हेतूंसाठी आणि प्रामुख्याने दलित समाजाची संख्या जाणून घेण्यासाठी सरकार त्यांची संख्या मोजू शकते, असे संघाने म्हटले आहे. आरएसएसचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी ही माहिती दिली आहे. बंगाल, वायनाड आणि तामिळनाडूमध्ये घडलेल्या घटनांवरही आरएसएसच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. बांगलादेशातील हिंदू आणि अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच यावर सरकारने कारवाई करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

वैष्णो देवी यात्रा मार्गावर भूस्खलन; दोन भाविक ठार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२जम्मू त्रिकोट

माता वैष्णो देवी यात्रेदरम्यान एक दुर्घटना घडली आहे. यात्रा मार्गावर भूस्खलन झाले असून, दोन भाविकाचा मृत्यू झाला आहे, तर एक भाविक गंभीर जखमी झाला आहे. भूस्खलनाचा व्हिडीओही समोर आला आहे. दुर्घटना घडल्याची माहिती मिळाल्यानंतर मदत आणि बचाव कार्य युद्ध पातळीवर हाती घेण्यात आले आहे. जखमी झालेल्या भाविकाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, प्रकृती स्थिर असल्याचे प्रशासनाने सांगितले.

मदत आणि बचाव कार्य युद्ध पातळीवर

यात्रा मार्गात भूस्खलन झाल्याच्या घटनेनंतर प्रशासनाने भाविकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाने ये-जा बंद केली असून, मार्गावरील मलबा तातडीने उचलण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या घटनेचा व्हिडीओ समोर आला असून, यात वैष्णो देवी मार्गावर मातीचा ढीग पडल्याचे दिसत आहे. दरड मार्गावरील छतावर कोसळली. त्यामुळे छताचेही मोठे नुकसान झाले आहे. व्हिडीओमध्ये मार्ग बंद झाल्याचे दिसत आहे. भारतातून आणि परदेशातून दरवर्षी लाखो भाविक वैष्णो देवीच्या दर्शनाला येतात. २०२३ मध्ये ९३.५० लाख भाविकांनी वैष्णो देवीचे दर्शन घेतले.जम्मूमधील रियासी जिल्ह्यात असलेल्या त्रिकूट डोंगरामध्ये वैष्णो देवी मंदिर आहे.१०८ शक्तिपीठांपैकी आहे. सर्वाधिक भाविक दर्शनाला येणाऱ्या देवस्थानांपैकी हे एक आहे. नवरात्री सारख्या उत्सवावेळी इथे भाविकांची मोठी गर्दी असते.

केजरीवालांना झटका! 'आप'च्या आमदाराला ईडीने केली अटक

विदर्भ प्रजासत्ताक दि.२नवी दिल्ली

राजधानी दिल्लीत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाला मोठा झटका बसला आहे. आम आदमी पार्टीचे ओखला विधानसभेचे आमदार अमानतुल्ला खान यांना अंमलबजावणी संचालनालयाने अटक केली आहे. अमानतुल्ला खान यांच्या घरावर ईडीने सकाळी छापा टाकला होता. सहा तासांच्या चौकशीनंतर ईडीच्या पथकाने अमानतुल्ला खान यांना ईडीने अटक करुन सोबत नेले. कथित वक्फ बोर्ड घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात ईडीने ही कारवाई केली आहे. ईडीच्या छाप्यानंतर अमानतुल्ला खान यांच्या घराबाहेर मोठा गोंधळ उडाला होता. त्यानंतर अखेर ईडीने पथकाने खान यांना अटक केली आहे.

ईडीचे पथक सोमवारी सकाळी आमदार अमानतुल्ला खान यांच्या घरी छापा टाकण्यासाठी पोहोचले होते. अमानतुल्ला यांनी सुरुवातीला ईडीच्या पथकाला घरात येऊ दिले नाही. त्यामुळे मोठा गोंधळ उडाला. सकाळी जेव्हा ईडीच्या पथक अमानतुल्ला खान घरात प्रवेश देत नव्हते तेव्हा दिल्ली पोलिसांच्या पथकाला तिथे बोलवण्यात आलं. पोलिसांनी अमानतुल्ला खान यांना समजवण्याचा प्रयत्न केला. आम्हाला घरात येऊ द्यायचे नसेल तर तुम्ही घराबाहेर येऊन तपासात सहकार्य करा, असे पोलिसांनी सांगितले. मात्र खान यांनी घरात आजारी सासू असल्याचे सांगत वाद सुरुच ठेवला. बऱ्याच वादावादीनंतर अधिकाऱ्यांनी घरात प्रवेश केला. अनेक तास झडती घेण्यात आली, सर्व कागदपत्रांची छाननी करण्यात आली. त्यानंतर खान यांना ईडीच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलं.

लाडकी बहीण योजनेबाबत मोठी बातमी: लाभ न मिळालेल्या महिलांसाठी सरकार लवकरच घेणार निर्णय?

विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई

राज्यात मागील काही दिवसांपासून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची मोठ्या प्रमाणात चर्चा आहे. या योजनेसाठी आतापर्यंत लाखो महिलांनी अर्ज केला आहे. मात्र या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट रोजी संपली. परंतु अजूनही अनेक पात्र महिला या योजनेपासून वंचित आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत वाढवण्याचा निर्णय राज्य सरकारकडून लवकरच घेतला जाण्याची शक्यता आहे.

सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत दिली होती. परंतु २१ ते ६५ या वयोगटातील पात्र असलेल्या मात्र अद्याप अर्ज न केलेल्या महिला या योजनेपासून वंचित राहू नयेत, यासाठी सरकार लवकरच अर्ज करण्याची मुदत आणखी एका महिन्याने वाढवणार असल्याचे समजते. सरकारने हा निर्णय घेतल्यास लाखो महिलांना दिलासा मिळणार आहे.

पैसे आले नाहीत हे करा:

बँक खात्यात पैसे येण्यासाठी आधार नंबर आणि बँक खाते एकमेकांशी लिंक असणे गरजेचे आहे. तसे नसल्यास महिलांना लाभ मिळणार नाही. त्यामुळे लवकरात लवकर महिलांनी आपले 'बँक सिडिंग' स्टेटस चेक करावे.आधार क्रमांक आणि बँक खाते एकमेकांशी लिंक नसतील तर ते लवकरात लवकर करून घ्यावे.

त्यानंतरच तुम्हाला माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे मिळतील.

बँक सिडिंग स्टेटस पाहण्यासाठी तुम्हाला https://uidai.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी लागेल.

वरील वेबसाईटवर आधारकार्ड नंबर टाकून कॅप्चा टाकून लॉगीन करा व आधार सिडिंग स्टेटस मध्ये जाऊन आधार कोणत्या बँकेला सीड आहे ते पाहता येईल.

१० सप्टेंबरपर्यंत महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरणार; चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर

विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीत जागावाटपाच्या बोलणीला सुरुवात झाली असून दहा सप्टेंबरपर्यंत सर्व जागांचा फॉर्म्युला निश्चित होणार आहे. शनिवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या उपस्थितीत महायुतीच्या नेत्यांची बैठक झाली होती. त्याबाबत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली.

शनिवारी नागपुरात लाडकी बहीण योजनेसाठी आलेल्या महायुतीच्या नेत्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या शासकीय निवासस्थानी रात्री साडेआठ ते एक या कालावधीत जागावाटपावर विस्तृत चर्चा करण्यात केली. दहा दिवसात संपूर्ण चर्चा अंतिम होईल. काही मुद्द्यांवर एकमत झाले आहे, तर काही मुद्दे बाकी आहे. दहा सप्टेंबरपर्यंत महायुतीचे जागा वाटपात एकमत होईल. बैठकीत कुठली आकडेवारी ठरली नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.महायुतीच्या बैठकीत सुमारे तासभर नागपूर अधिवेशनात विदर्भात मांडण्यात आलेले विकासकामांचे मुद्दे व सद्यस्थिती यांचा आढावा घेण्यात आला. रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यात येणार आहे.

जो जागा जिंकू शकेल त्यालाच उमेदवारी

शनिवारच्या बैठकीबाबत जागांच्या वाटपात विजयी होऊ शकणाऱ्या उमेदवारालाच प्राधान्य देण्यात येण्याबाबत एकमत झाल्याची माहिती आहे. जो जी जागा जिंकू शकेल त्या हिशेबानेच आम्ही महत्व देत आहे. उमेदवारांची क्षमता पाहून कोणत्या पक्षाला तिकीट जाईल हे निश्चित होणार आहे. सक्षम उमेदवारांनाच प्राधान्य देण्यात येईल. केवळ विजय हेच उद्दीष्ट्य आहे. जागांचा आग्रह कोणत्याही पक्षाने धरलेला नाही. वेळ पडली तर एक पाऊल मागे घेण्याचीदेखील तयारी असेल. विशेष म्हणजे एनडीएमधील इतर पक्षांचादेखील विचार करण्यात येईल. दहा सप्टेंबरनंतर महायुतीचे नेतेच जागावाटप जाहीर करतील, असे बावनकुळे यांनी सांगितले.

आज-उद्या जोरदार पावसाचा इशारा; २ दिवसानंतर पाऊस ओसरणार

विदर्भ प्रजासत्ताक दि.२ अमरावती

सध्या राज्यामध्ये जोरदार पाऊस होत असून, अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. मराठवाड्यासह विदर्भातील काही भागात पूर आलेले आहेत. तर हवामान विभागाने मंगळवारी (दि.३) राज्यातील अनेक भागात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे, तसेच दोन दिवसांनंतर पाऊस ओसरेल, असाही अंदाज वर्तविला आहे.

राज्यातील मराठवाड्यामध्ये पावसाचा जोर अधिक आहे. येथील सहा जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर अधिक आहे. परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये काही भागात जोरदार ते अतिजोरदार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांत काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे. धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यातही रेड अलर्ट आहे. तर नाशिक आणि जळगाव जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला.

Vidarbha Youth Welfare Society's
Prof. Ram Meghe Institute of Technology & Research
(An Autonomous Institute)
Badnera-Amravati
Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati
Visit us at: mitra.ac.in
DTE Code : 1105
= COURSES OFFERED =
B.Tech
U.G. Engineering Program
Civil Engineering - Choice Code 110519110
Electronics & Telecommunication Engineering - Choice Code 110537210
Mechanical Engineering - Choice Code 110561210
Computer Science & Engineering - Choice Code 110524210
Information Technology - Choice Code 110524610
Artificial Intelligence & Data Science - Choice Code 110526310
Computer Science & Engineering (IoT) - Choice Code 110526710
M.Tech
P.G. Engineering Program
Environmental Engineering- Choice Code 110520110
Structural Engineering- Choice Code 110521210
Computer Science & Engineering - Choice Code 110524210
CAD/CAM - Choice Code 110560410
Thermal Engineering - Choice Code 110561010
Information Technology - Choice Code 110524610
Electronics And Telecommunication Engineering - Choice Code 110537210
MBA
Master of Business Administration - Choice Code 110510110
MCA
Master in Computer Application - Choice Code 110524110
641 Offers received through campus drive
3216 Students placed through campus drive
20LPA Highest Package Offered
4.8LPA Average Package Offered
41 YEARS OF TRUST & RELIEF
NEXT STOP TO THE TOP
PRMITGR - A place where GOOD becomes the BEST
Highlights
24 different Courses (UG, PG & Ph.D.)
3817 Students with 1361 Girls
3108 Students placed in last five years
219 Faculty members with 64 Ph.D.
291 Students with distinction
283 University-Colour holders

बच गयी मैं, तो जला हीं क्या, नवनीत राणांचे बच्चू कडूंवर पुन्हा शरसंधान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती

दहीहंडी कार्यक्रमाच्या निमित्ताने भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा आणि अचलपूरचे आमदार बच्चू कडू यांच्यात पुन्हा एकदा वाक युद्ध सुरू झाले असून बच्चू कडू यांनी चांदूर बाजार येथे नवनीत राणा यांच्यावर केलेल्या टीकेनंतर नवनीत राणा यांनी शेरो-शायरीतून त्यावर प्रत्युत्तर दिले आहे. जल गया सब कुछ बचा ही क्या, असे वक्तव्य बच्चू कडूंनी नवनीत यांच्या पराभवाविषयी केले होते, त्यावर नवनीत राणा म्हणाल्या बच गयी मै, तो जला ही क्या.

दोन दिवसांपूर्वी परतवाडा

येथील दहीहंडी कार्यक्रमात नवनीत राणा यांनी बच्चू कडू यांच्यावर टीका केली होती. बच्चू कडू हे तोडीबहाद्दर, ढोंगी, ब्लॅकमेलर, नाटकबाज आहेत, त्यांना अचलपूरची जनता धडा शिकवणार, असा इशारा त्यांनी दिला होता. दरम्यान, बच्चू कडू यांनी चांदूर बाजार येथील कार्यक्रमात बोलताना राणा दाम्पत्याचा शेरो-शायरी आणि खास वैदर्भीय भाषेत समाचार घेतला होता. आलतू-फालतू कुणी बोलले, त्याकडे लक्ष द्यायचे नाही. 'किस गली के खसखस है वो, और कहां से आये है वो.. आग लग गयी है, तो धुवां तो उठेगा वाला है', अशा शब्दात राणा दाम्पत्यावर टीका केली होती.

रम्यान, या टीकचा संदर्भ देत नवनीत राणा यांनी रविवारी सायंकाळी येथील नवाथे चौकात आयोजित दहीहंडी कार्यक्रमात बच्चू कडूंना प्रत्युत्तर दिले. नवनीत राणा म्हणाल्या, विरोधकांनी एकत्र येऊन आपला पराभव केला, पण त्यामुळे अमरावती जिल्हा विकासाच्या बाबतीत दहा वर्षे मागे गेला आहे. करोनानंतर आपल्याला मतदारसंघात विकास कामे करण्यासाठी केवळ अडीच वर्षे मिळाली, पण याही कालावधीत बडनेरा वॅगन प्रकल्प, विमानतळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मेगा टेक्स्टाईल पार्क यासारखे प्रकल्प आपण मार्गी लावले. ही मोठी उपलब्धी आहे. पण काही लोकांच्या डोळ्यात हे खुपत होते. विरोधकांनी एकत्र येऊन आपला पराभव केला. केवळ खासदारकी गेली आहे, पण अजूनही मी जिवंत आहे आणि लढाई संपलेली नाही.

नवनीत राणा म्हणाल्या, काही लोक हे चपलेसारखे असतात, ते आपल्या सोबत असतात पण चालत असताना चिखल उडवत असतात. याचा रोख कुणाकडे आहे, हे लोकांना चांगले माहीत आहे, असे सांगून त्यांनी कुणाचेही नाव घेणे टाळले.

संपादकीय .....

एकीकृत पेन्शन योजना किती फायदेशीर?

वीस वर्षांनंतर सरकारी कर्मचार्यांना पेन्शनसंबंधी एक नवीन योजना उपलब्ध झाली आणि ती २००४ च्या पेन्शन योजनेच्या तुलनेत खूप चांगली आहे. उदा. सरकारी कर्मचार्यांना एक निश्चित रकमेची हमी पेन्शनच्या रूपातून मिळणार आहे आणि ती सुविधा 'एनपीएस'मध्ये नव्हती. त्याचवेळी कर्मचारी वेतनाच्या दहा टक्के वाटा अंशदान रूपातून जमा करत होता; पण नव्या योजनेच्या माध्यमातून २५ वर्षांपर्यंत काम केल्यानंतरच शेवटच्या वर्षातील मूळ रकमेचा ५० टक्के वाटा कोणत्याही स्थितीत पेन्शनच्या रूपातून कर्मचार्यांना मिळणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारने केंद्रीय सरकारी कर्मचार्यांसाठी निवृत्ती वेतनाच्या एका नव्या योजनेला मंजुरी देत महत्त्वाचे पाऊल टाकले. एकीकृत पेन्शन योजना (युनिफाईड पेन्शन स्कीम- यूपीएस) असे त्याचे नाव असून आगामी आर्थिक वर्षाच्या प्रारंभी म्हणजे १ एप्रिल २०२५ पासून ती लागू केली जाईल. यामुळे केंद्राच्या २३ लाख कर्मचार्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना प्रत्यक्ष रूपाने आर्थिक लाभ मिळेल. गेल्या काही वर्षांपासून सरकारी कर्मचार्यांसाठी २००४ मध्ये वाजपेयी सरकारने आणलेल्या नव्या पेन्शन स्कीम योजनेबाबत असंतोष व्यक्त केला जात होता. विरोधकांनीही या योजनेला आक्षेप घेत राजकीय मुद्दा केला. काही राज्यांनी तत्कालीन काळात जुनी पेन्शन स्कीम (ओपीएस) लागू केली आणि नवी पेन्शन योजना नाकारली होती. सर्वप्रथम राजस्थानच्या गेहलोत सरकारने जुनी योजना लागू केली. या सर्व घडामोडींचा दबाव केंद्रावर सातत्याने होता. त्यामुळे २०२३ च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी टी. व्ही. सोमनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नव्या पेन्शन योजनेसंदर्भात समिती स्थापन करण्याची घोषणा केली. या समितीचा आराखडा लोकसभा निवडणुकीपूर्वी जाहीर करणे अपेक्षित होते; पण ते होऊ शकले नाही; मात्र केंद्रात तिसर्यांदा सत्ता स्थापन केल्यानंतर शंभर दिवस पूर्ण होण्याच्या अगोदरच सरकारने नवीन आणि सर्वसमावेशक योजनेला मंजुरी दिली.

एकीकृत पेन्शन योजनेने एका चर्चेला हवा दिली आणि ती म्हणजे केंद्र इंग्रजाच्या काळापासून लागू असलेली आणि २००४ पर्यंत कायम राहिलेली जुनी पेन्शन योजनेकडे पुन्हा झुकते माप देत आहे का? पण, केंद्राचे असे कोणतेही धोरण दिसत नाही, हेही लक्षात घ्यायला हवे. जुन्या पेन्शन योजनेनुसार सरकारी कर्मचार्यांना सेवा कार्यकाळात पेन्शन निधीत काहीही जमा करावे लागत नाही, तसेच निवृत्त झाल्यानंतर पेन्शन अणि मृत्यूनंतर कुटुंबाला मिळणारी पेन्शन शंभर टक्के सरकारी अंशदानाच्या आधारे मिळत राहते. स्वतंत्र भारतात ही योजना ५७ वर्षे अंमलात राहिली. २००४ मध्ये ती योजना संपवून नवीन पेन्शन योजना आणली आणि त्यात सरकारी कर्मचार्यांना सेवा कार्यकाळात पेन्शनच्या दृष्टीने वेतनातील एक भाग नियमित रूपाने अंशदान देणे बंधनकारक केले होते; पण २०२५ मध्ये लागू होणार्या युनिफाईड पेन्शन स्कीममध्ये (यूपीएस) कर्मचार्यांना २००४ च्या नव्या पेन्शनप्रमाणेच वेतनाच्या १० टक्के रक्कम निधीत जमा करावा लागेल; पण आता यात सरकारचा वाटा आणखी वाढणार आहे. एकुणातच कर्मचार्यांना पेन्शनच्या हेतूनेच अंशदान जमा करावे लागेल आणि त्यात कोणतीही सवलत दिलेली नाही, हे लक्षात घ्या.

या योजनेची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे, सेवा किमान १० वर्षे केली असेल, तर मासिक पेन्शनची रक्कम ही दहा हजार रुपये निश्चितच असेल. एक अन्य सकारात्मक बाजू म्हणजे पेन्शन असणार्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास मासिक पेन्शनचा ६० टक्के वाटा कौटुंबिक पेन्शनच्या रूपातून कर्मचार्याच्या वारसास दरमहा मिळत राहील आणि या योजनेनुसार महागाई भत्त्यालाही पेन्शनच्या रकमेत सामील केले आहे. अर्थात, ही सुविधा एनपीएसमध्ये नव्हती. दर तीन वर्षांनंतर पेन्शन फंडमध्ये सरकारी अंशदानाची मर्यादा वाढविण्यासंदर्भात मूल्यांकन केले जाईल आणि हे अंशदान सध्या १८.५ टक्के निश्चित केले आहे. कर्मचार्यांचे अंशदान भविष्यात १० टक्केच राहील आणि त्यात वाढ केली जाणार नाही. या तरतुदी पाहता ही पेन्शन योजना २००४ च्या योजनेच्या तुलनेत चांगली दिसत आहे. तसेच २००४ च्या योजनेतून या योजनेत येणार्या कर्मचार्यांना फरकही दिला जाईल. त्याचा आर्थिक बोजा किमान ८०० कोटी रुपयांचा असेल. जुन्या योजनेची आणि एकीकृत पेन्शन योजनेची तुलना केल्यास सरकारने या योजनेच्या माध्यमातून जुनी पेन्शन योजनेचे लाभ पुन्हा कर्मचार्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे, तरीही काही गोष्टींवर आजही जुनी पेन्शन योजना तुलनेने सरकारी कर्मचार्यांसाठी अधिक फायदेशीर राहत असल्याचे दिसून येते. एक त्यात किमान २० वर्षांनंतर वेतनाच्या ५० टक्के रक्कम पेन्शनच्या रूपातून मिळणे निश्चित होते आणि तो लाभ आता २५ वर्षांनंतर मिळणार आहे. दुसरे म्हणजे, या योजनेनुसार निवृत्ती मिळाल्यानंतर ग्रॅच्युइटीची रक्कम जुन्या पेन्शन योजनेच्या तुलनेत सुमारे ३० टक्के कमी राहील आणि त्यामुळे या योजनेत सामील होणार्या कर्मचार्यांसाठी हे एक प्रकारचे आर्थिक नुकसान राहू शकते; मात्र दुसरीकडे जुन्या पेन्शन योजनेच्या तुलनेत एकीकृत निवृत्ती योजनेत काही चांगल्या बाजूही आहेत. फॅमिली पेन्शननुसार आता ६० टक्के वाटा दिला जाईल, तर पूर्वी हा ३० टक्के होता आणि किमान पेन्शनची मर्यादाही ९ हजारांवरून १० हजार रुपये केली आहे. त्यामुळे कर्मचार्यांकडून या योजनेचे स्वागत होईल; पण काही प्रमाणात नाराजीचे सूरही उमटू शकतात.

'लॉकडाऊन'मध्येही महिलांवरील अत्याचारात वाढ

महाराष्ट्रात दिवसाला १०९ घटनांची नोंद - एनसीआरबीची आकडेवारी

विदर्भ प्रजासत्ताक

दि.२ मुंबई - राज्यात सर्वत्र महिला अत्याचाराच्या घटनांना मोठे पेव फुटले असताना एकूणच जनमानस संतप्त आहे. या पार्श्वभूमीवर नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (एनसीआरबी) आकडेवारीचा केला तर महाविकास आघाडी आणि महायुतीच्या काळातील दैनंदिन सरासरी घटनांची संख्या १२६ इतकीच असल्याचे लक्षात येते. २०२१ या कोविडच्या लॉकडाऊन काळात सुद्धा महाराष्ट्रात प्रतिदिवशी १०९ महिला अत्याचाराच्या घटना घडत होत्या. विशेष म्हणजे जानेवारी ते जून २०२२ या काळात ज्या सरासरी १२६ घटना प्रतिदिवशी घडत होत्या, तितक्याच घटना म्हणजे प्रतिदिन १२६ इतकीच संख्या आजही आहे.

बदलापूरची घटना आणि एनसीआरबीचे विश्लेषण केले असता असे लक्षात येते की, २०२० या लॉकडाऊनच्या वर्षांत महाराष्ट्रात ३१,७०१ महिलांवर अत्याचार झाले, त्याची सरासरी ८८ घटना प्रतिदिवशी इतकी होती. २०२१ हे सुद्धा लॉकडाऊनचेच वर्ष होते. या वर्षात महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटनांची संख्या अचानक ३९,२६६ वर पोहोचली. याची सरासरी १०९ घटना प्रतिदिवशी इतकी येते. जानेवारी ते जून २०२२ या काळात महाविकास आघाडीच्या काळात एकूण २२,८४३ घटना महिला अत्याचाराच्या घडल्या. त्याची सरासरी १२६ घटना प्रतिदिवस इतकी आहे. ३० जून २०२२ रोजी महायुतीचे सरकार आले. जुलै ते डिसेंबर २०२२ या ६ महिन्यात २०,८३० घटना घडल्या. याची सरासरी ११६ घटना प्रतिदिवस इतकी येते. आता २०२३ मध्ये २०२२ इतक्याच घटना असून, त्याची सरासरी सुद्धा १२६ घटना प्रतिदिवस इतकी येते. याचाच अर्थ कोविड काळात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना जी सरासरी होती, तितक्याच घटना आज महाराष्ट्रात होत आहेत. एकूणच महिला अत्याचाराच्या घटनांची मविआच्या काळाइतकीच संख्या आजही दिसून येते.

मुलींवरच्या अत्याचाराच्या घटनेत वाढ - यातही अल्पवयीन मुलींवरचे अत्याचाराचे प्रयत्न (पॉक्सो कलम १२, भादंवि ५०९) या श्रेणीतील गुन्हे पाहिले तर त्यात अचानकच २०२१ पासून मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. हे गुन्हे २०१७ मध्ये ९४, २०१८ मध्ये ४८, २०१९ मध्ये ९४, २०२० मध्ये ४८ इतके होते. ते २०२१ पासून अचानक वाढले आणि ती संख्या २४९ वर पोहोचली. २०२२ मध्ये ही संख्या ३३२ इतकी आहे. यातील जून २०२२ पर्यंत राज्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वात महाविकास आघाडी सरकार होते आणि अनिल देशमुख हे गृहमंत्री होते.

दोन्ही सरकारच्या काळातील सरासरी सारखीच- ३० जून २०२२ रोजी महायुतीचे सरकार आले. जुलै ते डिसेंबर २०२२ या ६ महिन्यात २०,८३० घटना घडल्या. याची सरासरी ११६ घटना प्रतिदिवस इतकी येते. आता २०२३ मध्ये २०२२ इतक्याच घटना असून, त्याची सरासरी सुद्धा १२६ घटना प्रतिदिवस इतकी येते.

मधमाशीपालन व्यवसायासाठी केंद्राची ही योजना देईल तुम्हाला पाठबळ

दि.२विदर्भ प्रजासत्ताक

आत्मनिर्भर भारताचा भाग म्हणून २०२० मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियानाची घोषणा केली. ही योजना राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळ (छइइ) द्वारे संचालित केली जाते. ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे.

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांना राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियानाच्या अंमलबजावणी करिता सन २०२१ मध्ये अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मान्यता देण्यात आली.

उद्देश- मधुमक्षिकांचे संरक्षण, मध उत्पादनास प्रोत्साहन आणि पर्यावरणीय शाश्वतता सुनिश्चित करणे व मधुक्रांतीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारतातील शास्त्रोक्त मधुमक्षिकापालनाचा सर्वांगीण विकास आणि प्रोत्साहन देणे.

शेती आणि बिगरशेती कुटुंबांसाठी उत्पन्न आणि रोजगार निर्मितीसाठी मधमाशीपालन उद्योगाच्या सर्वांगीण वाढीला चालना.

कृषी व फलोत्पादन पिकांची उत्पादन वाढ.

मधुमक्षिका पालनाद्वारे महिलांचे सक्षमीकरण.

मधुमक्षिका पालन व मध उत्पादनासाठी कृषी उद्योजक आणि कृषी स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणे.

मध व इतर उच्च मूल्य मधमाशी उत्पादनांच्या उत्पादनासाठी मधुमक्षिकापालन उद्योगात नवीनतम आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्ये वापरण्यास, विकसित करण्यास प्रोत्साहन देणे.

सहकाराच्या माध्यमातून संस्थात्मक चौकट तयार करून म्हणजेच स्वयंसहाय्यता गट, शेतकरी उत्पादक संघ यांची स्थापना करून मधुमक्षिका पालकांचे सक्षमीकरण करणे.

समाविष्ट घटक

१) लघु अभियान I २) लघु अभियान खख ३) लघु अभियान खखख

१) लघु अभियान I

या अभियानांतर्गत शास्त्रोक्त मधुमक्षिकापालनाचा अवलंब करून परागीकरण करून विविध पिकांचे उत्पादन आणि उत्पादकता यांच्यात सुधारणा घडवून आणण्यावर भर दिला जाईल.

समाविष्ट बाबी-

दर्जेदार न्युक्लियस स्टॉक केंद्रांचा विकास.

मधुमक्षिका जननकांचा विकास.

गरजेनुसार भाड्याने वस्तू/सेवा देणारी केंद्र.

मधुमक्षिका स्नेही वनस्पती, फुलझाडे, मधुमक्षिका वाटिका लागवड

मधुमक्षिका पालनाद्वारे महिलांचे सक्षमीकरण करणे.

मध व इतर उत्पादने तपासणी प्रयोगशाळा.

मधुमक्षिका पालनासाठी लागणाऱ्या उपकरणांचे उत्पादन करणाऱ्या युनिट्सची स्थापना करणे.

मधुमक्षिका रोग निदान व उपचार प्रयोगशाळा/फिरती प्रयोगशाळा.

मधुमक्षिकापालन परिसंवाद, प्रशिक्षण इ.

२) लघु अभियान

या अभियानांतर्गत पीक काढणीनंतरच्या मधुमक्षिकापालन/पोळे यांच्या व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित केले जाईल. यामध्ये संकलन, साठवणुक, पणन, मूल्यवर्धन इ. बाबी समाविष्ट आहेत आणि या प्रक्रियांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देण्यात येत आहे.

समाविष्ट बाबी

मध व इतर पोळे उत्पादनांचे संकलन, विक्री, बॅन्ड विकसित करणे, पणन सुविधा इ. साठी केंद्र. मध व इतर पोळे उत्पादनांचे पॅकिंग व साठवणूक, शीतगृहे. मध व इतर पोळे उत्पादनांवरील प्रक्रियांसाठी प्रकल्प. मध व इतर पोळे उत्पादनांवर प्रक्रिया करणाऱ्या युनिट्स/कारखान्यांचे नुतनीकरण/विस्तार. मध व इतर पोळे उत्पादनांवर प्रक्रिया करणाऱ्या युनिट्सकरिता अंतर्गत चाचणी प्रयोगशाळा इ.

३) लघु अभियान खखख

या अभियानात विविध प्रदेश/राज्ये/कृषी विषयक हवामान आणि सामजिक आर्थिक स्थितीसाठी योग्य अशा संशोधन व तंत्रज्ञानाचा विकास करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

अर्ज कोणाला करता येतो ?- शेतकरी/मधुमक्षिकापालक/संघ/संस्था/कंपन्या/स्वयं सहाय्यता गट/शेतकरी उत्पादक संघ/शेतकरी उत्पादक कंपनी/राज्य कृषी विद्यापीठे/केंद्रीय कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्र इ.

अर्थसहाय्याचे स्वरूप

महाराष्ट्र राज्यासाठी अर्थसहाय्य खालीलप्रमाणे असेल

१) वैयक्तिक लाभधारक/शेतकरी/मधुमक्षिकापालक/संघ/संस्था/कंपन्या - ५०%

२) स्वयं सहाय्यता गट (SHG), संयुक्त दायित्व गट (गडक्र्) /शेतकरी/मधुमक्षिका पालनकर्ते हितसंबंधी गट (SHG)/सहकारी संघ (Co- operati ves)/ शेतकरी उत्पादक संघ/शेतकरी उत्पादक कंपन्या , राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळाकडे नोंदणी असलेले मधुमक्षिका पालनकर्ते महासंघ-७५%

३) राष्ट्रीय/राज्य स्तरावरील शासकीय संस्था राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळ, भारतीय कृषी संशोधन परिषद, राज्यातील कृषी विद्यापीठे/केंद्रीय कृषी विद्यापीठे - १००%

४) क्षमता बांधणी उपक्रमांसाठी शेतकरी, मधुमक्षिकापालक, अधिकारी यांचे प्रशिक्षण, परिसंवाद, कौशल्य विकास कार्यक्रमाकरिता - १००%

संपर्क- योजनेच्या अधिक माहितीसाठी व प्रस्ताव सादर करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय किंवा राज्यस्तरीय अंमलबजावणी यंत्रणा महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-०५ ई-मेल: infomahanhm.in, दूरध्वनी: (०२०)-२९७०३२२८. या ठिकाणी संपर्क करावा.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनांसाठी संकेतस्थळ: https://nbb.gov.in/

अपचनाचा त्रास सुरु होऊ शकतो, हे सांगणारी ४ लक्षणं- ओळखा तुमची पचनशक्ती कशी आहे



दि.२ विदर्भ प्रजासत्ताक

तुमची पचनशक्ती कशी आहे, यावर तुमचे बरेचसे आरोग्य अवलंबून असते. त्यामुळे आपली पचनशक्ती नेहमी उत्तम असली पाहिजे.

आपली पचनशक्ती नेमकी कशी आहे, हे कसं ओळखायचं, याविषयीची माहिती या इन्स्टाग्राम पेजवर डॉक्टरांनी शेअर केली आहे. त्यांनी ५ लक्षणं सांगितली आहेत. ती तुमच्यात दिसली तर तुमची पचनशक्ती उत्तम आहे हे ओळखावं...

पचनशक्ती चांगली असण्याचं पहिलं लक्षण म्हणजे तुम्हाला कधीही करपट ढेकर न येणे. किंवा क्वचित कधीतरी तसा त्रास होणे.

सकाळी उठल्यावर लगेचच पोट साफ होणे. त्यासाठी कधीही कोणताही त्रास न होणे.

पोट गच्च झाल्यासारखं न वाटणे. नेहमी हलकं वाटणे.

भूक, तहान नियमितपणे लागणे. भूकच लागत नाही, पाणी प्यावेच वाटत नाही, असा त्रास न होणे.

दिव्यांगांना दिला नितीन गडकरींनी दिलासा

जनसंपर्क कार्यक्रमास नागरिकांची गर्दी

विदर्भ प्रजासत्ताक

दि.२ नागपूर, कृत्रिम अवयव, ई-रिक्षा, उपचारासाठी वैद्यकीय मदत यासह विविध मागण्यांची निवेदने स्वीकारत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिव्यांगांना आधार दिला. संबंधित अधिकार्यांना तातडीने मदत करण्याच्या सूचनाही यांनी दिल्या.

खामला चौकातील जनसंपर्क कार्यालयात आज दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, तरुणांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती. दिव्यांगांनी सरकारी योजनांमधून मदत, कृत्रिम अवयव, ई-रिक्षा, ट्रायसिकल, वैद्यकीय मदत मिळण्यासंदर्भात निवेदने नितीन गडकरींना दिली. त्यांनी प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेतले.

तातडीने मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यासंदर्भात संबंधित सूचना केल्या. 'आपण पुढाकार घेतल्यामुळे काम झाले' अशी व्यक्तकरणार्या नागरिकांच्या शुभेच्छाही त्यांनी स्वीकारल्या.

भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटी

जनसंपर्क कार्यक्रमात दुपारी नितीन गडकरी यांनी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची विविध मागण्यांची निवेदने स्वीकारण्यात आली. यावेळी भाजपचे नागपूर शहराध्यक्ष जितेंद्र (बंटी) कुकडे, माजी नगरसेवक ॲड. निशांत गांधी आदींची उपस्थित होती.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण

नानकराम नेभनानी म्हणतात ..

महिला-तरुणींना मोफत बंदूक देण्याचा पहिल्या प्रयोग अमरावतीत करणार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ अमरावती

राज्यात सध्या महायुतीतूनच सरकारला अडचणीत आणण्याचे विविधांगी प्रयोग सुरू आहेत. असं वातावरण असतानाच अमरावतीत शिंदे गटाच्या नेत्यान पुन्हा एकदा खळबळजनक विधान केलं आहे.

महिला मुलींना मोफत बंदूक देण्याचा पहिला प्रयोग अमरावतीत करणार असून सरकारनं त्यासाठी आपल्याला परवानगी द्यावी, असं वक्तव्य मूर्तीजापुरचे माजी नगराध्यक्ष नानकराम नेभनानी यांनी केलं आहे.

शिंदे गटाचे आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी केलेल्या वक्तव्यामुळे महायुतीत कलह माजलेला असतानाच

नेभनानी यांनी केलेल्या या विधानामुळे शिंदे गटाची अडचण होण्याची शक्यता आहे.

बांगलादेशात होणाऱ्या हिंदूंवरील अत्याचाराविरोधात अमरावतीत २५ ऑगस्ट रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने महामोर्चा काढण्यात आला होता.

या महामोर्चाला मार्गदर्शन करताना मूर्तीजापुरचे माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना शिंदे गटाचे नेते नानकराम नेभनानी यांनी एक वादग्रस्त विधान केलं होतं.

मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी महिलांना बंदूक वापरण्याची परवानगी द्यावी. मी स्वतः महिलांना माझ्यातर्फे पिस्तूल घेऊन देईल.

महिलांनी स्वसंरक्षणासाठी रिव्हॉल्वर वापरावी, यात दोन-चार चांगली माणसे मेली तरी हरकत नाही. पण वाईट लोक वाचली नाही पाहिजे. याची जबाबदारी मी घेऊन कोर्टकचेरीचा खर्चही करायला तयार असल्याचं म्हणत नेभनानी यांनी खळबळ उडून दिली होती.

त्याच नेभनानी यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त विधान केलंय. महिला व मुलींवर होणाऱ्या अत्याचाराचा घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे त्यांच्या स्वस्वरक्षणासाठी महिलांना मोफत बंदूक देण्याचा पहिला प्रयोग प्रायोगिक तत्त्वावर अमरावतीत करणार असल्याचे नेभनानी यांनी जाहीर केलं. त्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी आपल्याला परवानगी देण्याची मागणीही त्यांनी केली आहे. महिला व मुलींना मोफत बंदूक देण्याच्या माझ्या वक्तव्यावर मी आजही ठाम आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अमरावती विधानसभा लढणार

अमरावती विधानसभेतून शिवसेना शिंदे गटातर्फे आपल्याला उमेदवारी मिळणार असल्याचा दावा देखील नानकराम नेभनानी यांनी केला आहे. सर्व समाज घटकातून त्यासाठी मोठे समर्थन मिळत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपल्या पाठीशी असून घटक पक्षातील तीनही पक्षांना आपली उमेदवारी मान्य आहे. त्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणुकीत आपण मैदानात उतरणार असून त्यात यशही मिळेल असेही त्यांनी नमूद केलं आहे.

पावसामुळे संत्रा गळती नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत

-उपमुख्यमंत्री अजित पवार

विदर्भ प्रजासत्ताक

दि.२ अमरावती- वरुड परिसरात गेल्या कालावधीमध्ये पावसामुळे झालेल्या संत्रा पिकाच्या नुकसान भरपाईचे पंचनामे तातडीने करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

वरुड तालुक्यातील नवासा पार्डी येथील ज्ञानेश्वर मोघे यांच्या शेतातील संत्रा पिकाच्या नुकसानीची पाहणी श्री. पवार यांनी केली. यावेळी त्यांच्यासमवेत खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार देवेंद्र भुयार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते उपस्थित होते.वरुड परिसरात गेल्या कालावधीमध्ये पावसामुळे संत्रा पिकाचे नुकसान होत आहे. सततच्या पावसामुळे संत्रा बहाराचे नुकसान होत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या नुकसानीची तातडीने पंचनामे करण्यात यावे आणि शेतकऱ्यांना विम्याची मदत मिळावी, यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशा सूचना दूरध्वनीद्वारे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना दिल्या. पहिल्या टप्प्यातील पंचनामे झाले असले तरी शेतकऱ्यांचे जादा होत असलेले नुकसान पाहता दुसऱ्या टप्प्यातही पंचनामे करून तातडीने मंत्रालयस्तरावर सादर करण्यात यावे. शेतकऱ्यांना मिळणारी मदत मिळवून देण्यासाठी योग्य ते सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही त्यांनी शेतकऱ्यांना दिले.यावेळी श्री. पवार यांनी संत्रा पिकाबाबत माहिती घेतली. संत्रा पिकासाठी येणारा खर्च आणि त्यातून मिळणारे उत्पादन याबाबत माहिती जाणून संत्र्याच्या असणाऱ्या जाती, चवीने उत्कृष्ट असणारे फळाची जाती, याबाबत माहिती घेतली. तसेच शेतकऱ्यांनी जनावरांसाठी हिरवा चारा उत्पादन घेण्यासाठी ही पुढे येण्याचे आवाहन केले.

मेळघाटात सेवा देणाऱ्या डॉ.चा वानवा

राजकीय नेते एकमेकांवर आरोप करण्यात मग्न

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ अमरावती -

अतिदुर्गम, अविकसित मेळघाटात सेवा देणाऱ्या डॉक्टरांची नेहमीच वानवा असते. यासाठी शासनाने शासकीय नोकरीत नव्याने रूजू होणाऱ्या डॉक्टरांना पहिली तीन वर्षे मेळघाटात सेवेची सक्ती केली आहे. परंतु तरीही मेळघाटात जाण्याकरिता तरूण डॉक्टर तयार नसल्याने आरोग्य विभागाला तज्ज्ञ डॉक्टरांसाठी अक्षरश: पायघड्या घालाव्या लागत आहेत. मेळघाटचा अतिदुर्गम भाग हा सदैव उपेक्षित असतो. शिक्षक असो वा डॉक्टर कोणालाही मेळघाटात नियुक्ती नको असते. मूलभूत सोयी-सुविधांपासून लांब, वनवासी जीणे कोण पदरी पाडून घेणार? आरामदायी

नोकरीची स्वप्ने पाहणाऱ्या तरूण पिढीच्या अंगावर तर मेळघाटच्या नावाने काटाच उभा राहतो. परिणामी येथील आदिवासींना वर्षानुवर्षे आरोग्याच्या सोईंपासून वंचित रहावे लागते. कुपोषणाने बालमृत्यूंचा आकडा दिवसेंदिवस फुगत आहे. ही बाब हेरून शासनाने नव्याने शासकीय नोकरीत येणाऱ्यांना मेळघाटात तीन वर्षे सेवेची सक्ती केली आहे. परंतु ही तीन वर्षे मेळघाटात घालविण्यास तरूण डॉक्टर तयार नाहीत. लाखो रूपये खर्च करून मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग निरक्षर, अंधश्रध्दाळू, गोरगरीब आदिवासींसाठी करण्याची यांची मानसिकता नाही. अशा स्थितीत आरोग्यसेवा सुधारावी कशी, असा प्रश्न आरोग्य विभागाला पडला आहे.

शिव तांडव शिरजगाव कसबा गोविंदा पथकाने २४.3 सेकंदात फोडली दहीहंडी

युवा स्वाभिमानाच्या दहीहंडीत तरुणाईचा प्रचंड जल्लोष

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ अमरावती युवा स्वाभिमान पार्टी आणि खा. नवनीत राणा आणि आ. रवी राणा यांच्यावतीने रविवारला नवाथे चौकामध्ये आयोजित दहीहंडी स्पर्धेत सकाळपासूनच तरुणाईचा जल्लोष बघायला मिळाला. सकाळी सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि दहिहंडीचे पूजन करण्यात आल्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्र माला सुरुवात झाली. दरम्यान दुपारी ३ वा. सुमारास चंकी पांडे, त्यानंतर तुषार कपूर व शरद केळकर यांनी दहिहंडी सोहळ्याला हजेरी लावून कार्यक्रमाची रंगत वाढविली. विशेष म्हणजे दिवसभर पावसाचीउघड- झाप सुरु असताना सुद्धा सर्व गोविंदा मंडळांसह तरुण-तरुणी गोपाल भक्तांचा उत्साह शेवटपर्यंत कायम होता. या स्पर्धेत विदर्भातील १६ गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. रात्री उशिरा शिवतांडव शिरजगाव कसबाचे गोविंद पथकाने २४.०३ सेकंदामध्ये निशाना साधत दहिहंडी फोडली आणि प्रथम क्रमांक पटकावला. विधिवत

हंडीचे पूजन झाल्यानंतर दहीहंडीला सुरुवात झाली दुपारी ३ वा. दरम्यान रंगमंचावर चित्रपट अभिनेता चंकी पांडे यांचे आगमन झाले. यावेळी मराठमोळ्या शैलीत नमस्कार अमरावतीकर... असे म्हणताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात जल्लोष करीत स्वागत केले. तर आ. रवि राणा आणि खा. नवनित राणा यांनी सुद्धा चंकी पांडे यांचे स्वागत केल्यानंतर चंकी पांडेयांनीसोगयाये जहा हे गीत सादर केले, तर खास संवाद बोलून दाखवत वातावरणात वेगळीच रंगत निर्माण केली. एवढेच नाही तर चंकी पांडेने तु मेरा तोता.... मै तेरी मैना... या गितावर तरुणाईने चंकी पांडेला साथ दिल्याने वातावरण जल्लोषमय झाले होते.चित्रपट अभिनेता तुषार कपूर याने सुद्धा उपस्थित तरुणासोबत डिजेच्या तालावर ठेका धरला... गोविंदा आला रे... आला रे... तेरे इश्क की... दिवानगी,.... दिल डिंग डॉग डिंग बोले... यासह रंगारंग गितांवर डान्स सादर करीत उपस्थित युवकांची मने जिंकली. दरम्यान व्यासपीठावर अभिनेता शरद केळकर यांचे आगमन झाले. यावेळी शरद केळकर आणि अभिनेता तुषार कपूर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा अभिषेक करून पूजन केले.

डिजेच्या, ढोलताशाच्या तालावर जल्लोष विशेष म्हणजे नवाथे चौक युवकांनी फूलून गेला होता. डिजेच्या तालावर आणि ढोलताशांच्या गजरात हजारो युवक ठेक्यावर ताल धरीत असल्याचे चित्र दिवसभर होते. गर्दी एवढी होती की, काही युवक बॅरीकेटस् वर तर काही गॅलरीत बसून तर काही हौसी उंच इमारतीवरून हा नेत्रदिपक सोहळा आपल्या नेत्रपटलात कैद करून घेत होता.एकीकडे दहिहंडीचा जल्लोष तर दुसरीकडे विविध सांस्कृतिक कलाविष्काराने दहिहंडी परीसरातील वातावरण फूलून गेले होते. प्रथम कृष्ण-राधा वेशभूषा स्पर्धा, त्यानंतर मराठी गीते, हिंदी गिते, लावणी आदींसह विविध प्रकारचे सांस्कृतिक नृत्य दिवसभर चिमुकल्यांसह तरुण-तरुणींनी सादर केले.या विदर्भस्तरीय दहिहंडी स्पर्धेत एकूण १६ गोविंदा पथक सहभागी झाले होते. संपूर्ण दिवस या गोविंदा पथकांची हंडी फोडण्यासाठी थरावर थर रचत कसरत सुरु होती. पण, ४० फुट उंचावरी असलेली दहीहंडी फोडण्यात त्यांना यश मिळाले नाही. त्यानंतर दहिहंडी ३० फुटापर्यंत खाली आणल्यानंतर ९.१५ वा. दरम्यान शिरजगावक सबा येथील शिवतांडव गोविंदा पथकाना केवळ ००.२४.०३ सेकंदात निशाना साधत दहिहंडी फोडली आणि प्रथम क्रमांक पटकाविला. तर दुसरे बक्षीस कालभैरव गोविंद पथक शिरजगाव कसबाने पटकावले. या गोविंदाटिमने ००.२९.६९ सेकदांत दहिहंडी फोडली. तर शिरजगाव कसबा येथीलच जय भोले गोविंदा पथकाने ००.३३.२६ सेकंदात दहिहंडी फोडून तिसऱ्या नंबरचे बक्षीस प्राप्तकेले. या सर्व विजेत्या गोविंदा पथकांना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा. डॉ. अनिल बोंडे, माजी खा.नवनित राणा आणि आ. रवि राणांसह अन्य मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करून सन्मानित करण्यात आले.

धामणगाव रेल्वे येथे एस- सी एस टी आरक्षण वर्गीकरण विरोध करणाऱ्या लोकांना लहुजी शक्ती सेना व दोन आमदारांनी चपला दाखवून केला विरोध

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती - मा. सर्वोच्य न्यायालय यांनी १ ऑगस्ट रोजी अनुसूचित जाती व जनजाती ह्या मधील उपेक्षित जातींना आरक्षणाचा लाभ मिळावा व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा कलमाचा वापर करून ७ न्यायधिष पैकी ६ न्याय धिश यांनी आरक्षण उपवर्गी करण करण्यास राज्य शासनास मान्यता दिलेली आहे ,आंध्र ,कर्नाटक , व इतर राज्यात ह्याच पूर्वी अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण कण्यात आले आहे .महाराष्ट्र मध्ये उपवर्गिकरण

करण्याची कार्यप्रणाली सुरू असताना काही जाती वंत लोकांच्या पोटात दुखत असून काँग्रेस चे नेते विजय वडट्टीवर यांनी सर्वोच्य न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा विरोध करून निषेध नोंदविलेला आहे त्या मुळे धामण गाव रेल्वे येथे लहुजी शक्ती सेनेच्या व सकल मातंग समाजाच्या वतीने भव्य मेळावा आयोजित केला होता त्या मध्ये लहुजी शक्ती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्रवुभाऊ कसबे , विधान परिषद चे आमदार अमितजी गोरखे , चांदूररेल्वेविधानसभा चे आमदार प्रतापदादा अडसड , लहुजी शक्ती सेनेचे विदर्भ अध्यक्ष डॉ .रुपेश खडसे, पंकज जाधव, जिल्हाध्यक्ष यांच्या उपस्थिती कार्यक्रम घेण्यात आला व सर्वोच्य न्यायालयाच्या आरक्षण उप वर्गीकरण निर्णयास विरोध करणाऱ्या लोकांना व जातिवंत पक्षांना चपला , जूते दाखवून निषेध करण्यात आला ह्या कार्यक्रमाचे आयोजन उमेश भूजाडणे जिल्हा उपाध्यक्ष , विनोद तिरले तालुका अध्यक्ष ,रणजित पोटफोडे , संतोष वाघमारे ि, गजानन ताकतोडे विदर्भ उपाधक्ष यांनी केले ह्या कार्यक्रमात अनिल सोनटक्के संपर्क प्रमुख , गौरव गवळी शहर अध्यक्ष, सरिता पोटफोडे महिला अध्यक्ष , प्रमोद खंडारे भाजप, रमेश अंभोरे,भाजप , राजाभाऊ हातागडे समाजभूषण ,ऍड संजय वानखेडे सुचिता कांबळे विचारवंत, प्रा.अशोक कांबळे लेखक , रमेश अवचार विदर्भ प्रचारकव शेकडो मातंग समाज बांधव उपस्थित होते

आरएफओंच्या बदल्यांमध्ये 'कही खुशी, कही गम'; पण मलईदार जागा रिक्तच

राज्यात पहिल्यांदाच वनवृत्तनिहाय बदल्यांची यादी जाहीर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ अमरावती- राज्याच्या महसूल व वनविभागाच्या इतिहासात पहिल्यांदाच ११९ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बदल्यांची यादी शुक्रवारी वनवृत्तनिहाय जाहीर केल्याने एकच खळबळ उडाली आहे. आतापर्यंत वनविभाग आरएफओंच्या बदल्यांची यादी राज्यस्तरावर जाहीर करीत होते. मात्र, शासनाने यंदा बदल्यांची यादी सर्कलनिहाय प्रसिद्ध करून नेमके काय साध्य केले, हे कुणालाही कळू शकले नाही; परंतु यात काहींनी 'अर्थ'पूर्ण व्यवहार केले; पण त्या ठिकाणी पोस्टिंग मिळाली नाही. त्यामुळे आरएफओंमध्ये 'कही खुशी,

कही गम' असे चित्र दिसून येत आहे.

वनवृत्तनिहाय रिक्त असलेल्या मलईदार जागा

कोल्हापूर वनविभाग : मलकापूर, वाई (सातारा वनविभाग), जत (सांगली), कणकवली, आंबोली व सावंतवाडी.

छत्रपती संभाजीनगर : खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर, तुळजापूर, भूम, लातूर विशेष कार्य.

गडचिरोली वनवृत्त : वडसा, कुरखेडा, आरमोरी, अहेरी, मार्कंडा कनसोबा.

ठाणे वनवृत्त : येवूर वन्यजीव, पनवेल, बदलापूर रिक्त.

नाशिक वनवृत्त : भंडारदरा वन्यजीव, हरिश्चंद्र वन्यजीव.

पुणे वनवृत्त : भांबुर्डा, वडगाव मावळ, पौंड, खेड राजगुरूनगर, मनचर ओतूर, सासवड, नरसापूर.

आरएफओंच्या 'विनंती' बदल्यांमध्ये 'फिक्सिंग'

वनविभागात शुक्रवारी आरएफओंच्या प्रशासकीय बदल्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. आता खऱ्या अर्थाने आरएफओंच्या 'विनंती' बदल्यांमध्ये मोठे 'अर्थ'पूर्ण राजकारण होण्याचे संकेत आहेत. त्यामुळेच राज्यात अनेक ठिकाणी 'विनंती'च्या आरएफओंनी मलईदार जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, अमरावती, यवतमाळ वनवृत्त या बाबीला अपवाद ठरले आहे. मेळघाटमधील बदलीपात्र आरएफओंवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली आहे.

आमदार श्रीकांत भारतीय यांना उत्कृष्ट भाषण पुरस्कार

उद्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार वितरण

विदर्भ प्रजासत्ताक
दि. २ अमरावती – विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषणांसाठीचे गेल्या सहा वर्षांमधील पुरस्कार एकाचवेळी जाहीर करण्यात आले आहेत. विधानसभेचा कार्यकाळ संपत आला असल्याने विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांना अखेर मुहूर्त मिळाला आहे. पुरस्कार जाहीर झाल्याचे फोन विधानमंडळ कार्यालयातून शनिवारी आमदारांना करण्यात आले. तसेच, त्यांना त्यासंबंधीचे पत्रही पाठविण्यात आले. मंगळवार ३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३. ३० वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.आमदार श्रीकांत भारतीय यांना मिळालेल्या या पुसरस्काराने अमरावतीकरांचा

शिरोपात मानाचा तुरा रोवला गेला आहे. अमरावती जिल्ह्या तील मूळ रहिवासी असले, तरी त्यांचा अधिक वावर हा प्रदेश पातळीवरील राजकारणात राहिला आहे. एक अभ्यासू नेते म्हणून त्यांची ओळख आहे. परतवाडा येथे शेतकरी, शिक्षक कुटुंबात जन्मलेल्या श्रीकांत भारतीय यांनी शेतकरी संघटनेत काम करताना शेतकरी आंदोलनातही सहभाग घेतला होता. प्राध्यापक, पत्रकार म्हणून त्यांनी काम केले. १९८५ पासून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते, विदर्भाचे प्रदेश संघटनमंत्री, आसाममधल्या बोडो अल्फा चळवळींवर अभ्यासक म्हणून काम, १९९४ पासून पूर्णवेळ भाजपचे कार्यकर्ते, नागपूर शहर संघटन मंत्री, नागपूर विभाग संघटन मंत्री, २००० ते २००६ युवा मोर्चा प्रदेश संघटन मंत्री, पुणे विभाग संघटन मंत्री, २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत 'वॉर रूम'चे प्रमुख, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत 'प्रदेश निवडणूक व्यवस्थापन समिती समन्वयक', २०१५ ते २०१९ तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी, २०२० पासून भाजपाचे प्रदेश सरचिटणीस अशी श्रीकांत भारतीय यांची कारकीर्द आहे.

यांना मिळणार पुरस्कार

विधानसभा – उत्कृष्ट संसदपटू – रमेश बोरनारे (शिवसेना), अमिन पटेल (काँग्रेस), राम सातपुते (भाजपा), उत्कृष्ट भाषण – कुणाल पाटील (काँग्रेस), श्वेता महाले (भाजपा), प्राजक्त तनपुरे (राष्ट्रवादी), विधान परिषद : उत्कृष्ट संसदपटू – अमोल मिटकरी (राष्ट्रवादी), गोपीचंद पडळकर (भाजपा), रमेश पाटील (भाजपा), उत्कृष्ट भाषण : आमशा पाडवी (शिवसेना), श्रीकांत भारतीय (भाजपा), सुनील शिंदे (शिवसेना).

देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना पक्षाची पकड राज्यातील ग्रामीण भागात मजबूत करण्यासाठी व्यूहनीती तयार करण्यात आली. यात श्रीकांत भारतीय यांची महत्त्वाची भूमिका होती, असे सांगितले गेले. राज्यातील नगर पंचायतींच्या निवडणुकीत भाजपने चांगली कामगिरी केली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यासोबतही त्यांचे चांगले संबंध राहिले आहेत. पश्चिम महाराष्ट्रात पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले. अनेक भागात कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी स्थानिक कार्यकर्त्यांसोबत जवळीक वाढवली. त्यांच्या या कामाचा आणि अनुभवाचा गृहक्षेत्र असलेल्या अमरावती जिल्हा आणि पश्चिम विदर्भातही फायदा व्हावा, हा पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना हेतू उमेदवारीमागे दिसून आला आहे.भाजपच्या किसान मोर्चाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे ते सदस्य देखील आहेत. आगामी निवडणुकीत पश्चिम विदर्भात पक्षाची रणनीती ठरविण्यासाठी त्यांच्या उपयोग होईल, असे भारतीय यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे.तर त्यांना मिळालेला हा पुरस्कार अमरावतीकरांसाठी अभिमानाची बाब आहे.

शिवराय आमचे दैवत, पुतळ्याची घटना खूप वेदनादायी, राजकारणात...

– अभिनेता शरद केळकर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती

सिंधुदुर्गच्या मालवण तालुक्यातील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. या मुद्द्यावरून राज्यातील राजकारण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळत आहे. राजकीय नेते राजकोट किल्ल्यावर जाऊन पाहणी करत आहेत. राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर राज्यात संताप व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी अनेक स्तरांतून प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. यातच आता अभिनेता शरद केळकर याने आपल्या भावना व्यक्त केल्या.

माजी खासदार नवनीत राणा आणि विद्यमान आमदार रवी राणा यांच्या वतीने दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बॉलिवूड अभिनेता शरद केळकर याने सहभाग घेतला. शरद केळकर याने छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली

आहे. मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी शरद केळकर याला प्रतिक्रिया विचारण्यात आली.

शरद केळकर याने कार्यक्रमस्थळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर दुग्धाभिषेक करून शिवरायांच्या नावाचा जयघोष केला. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल सर्व महाराष्ट्रीय व भारतीयांच्या मनात जी भावना आहे, तीच भावना माझ्याही मनात आहे. शिवराय हे आमचे दैवत आहेत, आम्ही त्यांच्यावर खूप प्रेम करतो, त्यांचा खूप आदर करतो. माझा सौभाग्य आहे की, मला त्यांच्या मूर्तीवर अभिषेक करण्याची संधी मिळाली. यासाठी मी अमरावती येथे या दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या आयोजकांचे आभार मानतो, असे शरद केळकर यांने नमूद केले.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या प्रकरणीराजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर राज्यात संताप व्यक्त करण्यात येत आहे. बोलताना, ही खूप वेदनादायी घटना आहे. ही घटना पाहून मला खूप दुःख झाले. मला या घटनेवर कोणत्याही प्रकारची राजकीय प्रतिक्रिया द्यायची नाही. कारण मी राजकारणात नाही, असे शरद केळकर याने स्पष्ट केले.

भारतीय जनता युवा मोर्चच्या वतीने

छत्रपती शिवाजी महाराजांचे पूजन व महाविकास आघाडीचा निषेध

राजकमल चौक येथे जोरदार नारेबाजी..

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ अमरावती मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा जो पुतळा कोसळला ही बाब संपूर्ण महाराष्ट्राच्या साठी व देशाच्यासाठी दुर्दैवाची आहे या प्रकरणावर देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी जाहीर माफी सुद्धा मागितलेली आहे,मात्र या संदर्भामध्ये महाविकास आघाडी ज्या पद्धतीचे गलिच्छ राजकारण करीत आहे याचा विरोधात आज संपूर्ण महाराष्ट्रभर भारतीय जनता युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र आंदोलन केले व आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे पूजन करुन महाविकास आघाडीचा निषेध केला, अमरावती येथील राजकमल चौक येथे राज्यसभेचे खासदार डॉक्टर श्री अनिलजी बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता युवा मोर्चा अमरावती जिल्हा ग्रामीण व अमरावती शहर जिल्हा च्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र आंदोलन केलेयावेळी बोलत असताना प्रामुख्याने डॉक्टर श्री अनिलजी बोंडे यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की मध्य प्रदेश येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तत्कालीन मुख्यमंत्री कमलनाथ मुख्यमंत्री असताना काढून टाकण्यात आला, तसेच

डिस्कवरी ऑफ इंडिया या पुस्तकामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान जनक उल्लेख केलेला आहे या सर्व वेळी काँग्रेस आणि त्यांचे मित्र पक्ष शांत होते, यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हारअर्पण करून पूजन करण्यात आले, एकंदरीतच यावेळी संपूर्ण राजकमल चौक छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, या नाऱ्यांनी गुंजला, यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या सह, ग्रामीण महामंत्री विवेक गुल्हाने, भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश महामंत्री बादल कुलकर्णी, मा.आमदार रमेशजी बुंडीले,युवा मोर्चा अमरावती जिल्हा ग्रामीण अध्यक्ष अजिंक्य वानखडे, विधानसभा प्रमुख प्रवीण तायडे गोपाल चंदन,युवा मोर्चा प्रदेश सचिव प्रणित सोनी, हरिष साऊरकर,युवा मोर्चा महामंत्री प्रवीण रुद्रकर, तुषार चौधरी श्याम साहू, सौरभ पिंपळकर,करणं धोटे, भूषण काळमेघ, प्रणित खवले, युवा मोर्चा पदाधिकारी अखिलेश किल्लेदार,यश शर्मा, अनिताताई तिखिले,मनोहर भाऊ लेवटे,कुंदन भाऊ यादव,विशाल भाऊ काकड,समीर हावरे,अतुल भाऊ गोळे,मनीष मेन,प्रणित खवले , कर्ण धोटे,भूषण काळमेघ,निखिल घुरडे,ललित ठाकूर, शुभम खेर्डे,सागर माहुरे, रोषण कॅटचारमल, अनुज वाटणे,व निरंजन दुबे,ऋषीकेश चौबे,आशुतोष शर्मा,गोलू जोशी,यश पट्टा,यश शर्मा,अनिकेत विश्वकर्मा,रोहित गुप्ता,सूरज वासनिक,युवराज पवार इत्यादी उपस्थित होते

रॉयली प्लॉटस्थित कॅफेआड 'दम मारो दम', क्राईम वनची हुक्का पार्लरवर धाड

शहरातील शाळा, कॉलेज व इतर ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थाची विक्री तसेच अमंली पदार्थ बाळगणारे, विकणारे तसेच सेवन करणाऱ्यांविरूद्ध धडक मोहिम राबविली जात आहे. युवावर्गाला नशामुक्त करण्यासाठी पोलीस यंत्रणा प्रयत्नशील असून, त्याबाबत शाळा, कॉलेज व इतर गर्दीच्या ठिकाणी बैठकी व कार्यशाळा घेण्यात येत आहेत.

– नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती : रॉयली प्लॉटस्थित साक्षी कॅफे ंड रेस्टारंटमध्ये कॅफेआड चालणाऱ्या हुक्का पार्लरवर शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट एकने धाड घातली. शनिवारी रात्री तेथून हुक्क्याचा 'दम' मारणाऱ्या चार तरूणांसह संचालकाला ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याविरूद्ध सिटी कोतवाली पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हे शाखा युनिट क्रमांक एकचे अधिकारी व अंमलदार कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना रॉयली प्लॉटस्थित साक्षी कॅफे ंड रेस्टॉरंट येथे हुक्का पार्लरमार्फत तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन सुरू असल्याची माहिती मिळाली. त्याआधारे, तेथील दुसऱ्या माळ्यावर धाड घातली असता साक्षी कॅफे ंड रेस्टॉरंटचामालक प्रणव प्रमेंद्र शर्मा (२६, रा. रॉयली प्लॉट) हा धुम्रपान व सेवनाकरिता तंबाखूजन्य पदार्थाची विक्री व सेवन करण्यास सहाय्य करतांना विनापरवाना मिळून आला. तसेच तेथे मोहीत सुनिलकुमार फलवाणी (२१, रा. कृष्णा नगर), प्रथमेश मनोजराव मसांगे (१८, रा. गाडगेनगर), पियुष सुनिल बसंतवाणी (२१, रा. कृष्णा नगर) हे हुक्का पिताना आढळून आले.

आरोपी प्रणव शर्मा याच्याकडून २१०० रुपये किमतीचा हुक्का पॉट, पानरस फ्लेवरचे छोटे पॅकेट, फ्लेवरचे डबे व सहा मॅजिक कोल पॅकेट असा ३२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना पुढील कारवाईसाठी सिटी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

गुन्हे शाखा युनिट एकचे प्रमुख तथा वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरिक्षक मनीष वाकोडे यांच्या टिमने ही कारवाई केली. विशेष म्हणजे, १५ ऑगस्ट रोजी रात्रीदेखील राजहिलनगर येथील एका फ्लॅटमध्ये चालणाऱ्या हुक्का पार्लरचा तेथील स्थानिक लोकांनी पर्दाफाश केला होता. त्यानंतर राजापेठ पोलिसांनी तेथून हुक्कासाहित्य जप्त केले होते.

गणेशोत्सवात सामाजिक बांधिलकी जोपासावी- पो.उपायुक्त सागर पाटील

नांदगाव पेठ पो.स्टे.येथे गणेश मंडळांची बैठक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ नांदगाव पेठ सण, उत्सव हे एकतेचे प्रतीक असते, सदभावना आणि उत्साह निर्माण करणाऱ्या सणांमुळेच आपली संस्कृती टिकून आहे.गणेशोत्सव सुद्धा लहान थोरांपासून प्रत्येक कुटुंबात आनंद निर्माण करणारा सण आहे त्यामुळे या गणेशोत्सवात प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जोपासावी असे आवाहन पोलीस उपायुक्त सागर पाटील यांनी नांदगाव पेठ पोलीस स्टेशन येथे आयोजित गणेश मंडळ पदाधिकारी बैठकीत केले.ते पदाधिकाऱ्यांना यावेळी मार्गदर्शन करत होते. आगामी गणेशोत्सव सणाच्या पार्श्वभूमीवर नांदगाव पेठ पोलीस स्टेशन येथे गणेश मंडळ पदाधिकारी,शांतता समिती सदस्य, ग्रामपंचायत, वीज वितरण कंपनी कर्मचारी यांची बैठक अयोजित करण्यात आली होती. यावेळी बैठकीला पोलीस उपायुक्त

सागर पाटील, स.पो.आयुक्त कैलाश फुंडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले, सरपंच कविता डांगे आदींची उपस्थिती होती. बैठकीमध्ये सागर पाटील यांनी महत्वाच्या सूचना गणेश मंडळाला दिल्या. गणेश मंडळांच्या समस्या सुद्धा यावेळी नमूद करण्यात आल्या. गणपती स्थापना ,विसर्जन मार्गावरील वरील रस्ते व्यवस्थित करणे, इलेक्ट्रिक तारा बाजूला करणे, झाडांच्या लोमकळलेल्या फांद्या तोडणे, विसर्जनच्या वेळी गणपती मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, विसर्जनाच्या ठिकाणी संपूर्ण सुरक्षा व्यवस्था करणे आदी सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या. गणेश मंडळांनी सामाजिक एकोपा निर्माण करणारे देखावे, सजावटी,सामाजिक संदेश देणारे बॅनर लावण्यात यावे असे देखील आवाहन उपस्थित अधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले.

वरुडमध्ये भव्य मेळाव्याचे आयोजन, लोकसभा निवडणुकीत शेतकऱ्यांची नाराजी भोवली

उपमुख्यमंत्री अजित पवारांची कबुली कापूस, सोयाबीन आणि संत्री उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा उल्लेख

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (अजित पवार) गेल्या ८ ऑगस्टपासून राज्यात जनसन्मान यात्रा सुरू केली आहे. महिला, तरूण, शेतकरी यांच्याशी उपमुख्यमंत्री अजित पवार संवाद साधत आहे. वरूड येथील मेळाव्यात बोलताना अजित पवार यांनी कांदा उत्पादकांसह विदर्भातील कापूस, सोयाबीन आणि संत्री उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा उल्लेख केला. लोकसभा निवडणुकीत शेतकऱ्यांच्या नाराजीचा फटका बसल्याची अप्रत्यक्ष कबुली त्यांनी दिली. कांदा निर्यातबंदी होऊ नये तसेच सोयाबीन आणि कापसाला योग्य भाव मिळावा, यासाठी आपण केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. येत्यानिवडणुकीत तुम्हीपुन्हा देवेंद्राला मतदान रूपी आर्शीवाद द्या, राहलेला संपूर्ण विकास पुर्णत्वास नेवून या मतदार संघाचा कायापालट करण्यासाठी वाट्टेल तितका निधी मी देईल, अशी ग्वाही अजित दारांनी यावेळी दिली.मोर्शी विधानसभा मतदार संघामध्ये गेल्या साडेचार वर्षात ईतिहासात नव्हे इतका ४ हजार ३७२ कोटी रुपयांचा निधी आणुन संपूर्ण मतदार संघात विकासकामे करण्यात आली आहे. म्हणुन मी राज्याचा अर्थमंत्री या नात्याने तुम्हाला एकच सांगेल येत्या निवडणुकीत तुम्ही पुन्हा देवेंद्राला मतदान रूपी आर्शीवाद द्या राहलेला संपूर्ण विकास पुर्णत्वास नेउन या मतदार संघाचा कायापालट करण्यासाठी वाट्टेल तितका निधी मी देईल, असे ते

म्हणाले.यावेळी अजित पवार पुढे म्हणाले की, माझी आणि देवेंद्रची फार ओळख नव्हती परंतु मोर्शी मतदारसंघाचा विकास व्हावा, बेरोजगारांच्या हाताला कामे मिळावी, महिलांची प्रश्न सुटावित, संत्रा, मोसंबी, कपाशीला भाव मिळावा, यासाठी देवेंद्र सतत पाठपुरावा करीत असतो, त्याला मी निधीची कमतरता पडू देणार नाही, संपुर्ण महाराष्ट्रात कोणीच एवढा निधी केवळ एका मतदार संघासाठी आणला नाही मात्र देवेंद्रने ते गे करुन दाखविले.असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी केले. या जाहीर सभेला व्यासपिठावर उपमुख्यमंत्री अजीत पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खा. प्रफुल्ल पटेल, आ.देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते तथा आ. अमोल मिटकरी, विधिमंडळ समन्वयक संजय खोडके, जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, राज्य उपाध्यक्ष वसंत घुखेडकर, राज्यसमन्वयक सुरेखा ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशसदस्य प्रमोद उर्फ बाळु पाटील, डॉ. मोनाली भुयार, जरुडचे माजी सरपंच सुधाकर मानकर, वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रमोद पोतदार, मालखेडचे सरपंच विजय वडस्कर, डॉ. सुधाकर बंदे, डॉ. मिना बंदे, ऋषीकेश राऊत, तारेश देशमुख, मार्ज पंचायत समिती सभापती निलेश मगर्दे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खा. प्रफुल्ल पटेल यांन अजीत पवार हे कणखर नेते असून त्यांच्या काम करण्याची पध्दत प्रचं वेगळी असल्यानेच त्यांचेकडून मोठी आशा निर्माण झाली आहे. यावेळ आ. देवेंद्र भुयार यांनी गेल्या साडेचार वर्षात उपमुख्यमंत्री अजीत पवार यां वरुड मतदारसंघाक रीताएवढच्या मोठ्याप्रमाणातनिधी उपलब्ध कर दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.याप्रसंगी वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल डॉ. प्रमोद पोतदार उपजिल्हा रुग्णालयाला जमिन दान दिल्याबद्दल डॉ. सुधाकर वंदे, तसेच महिला रुग्णालयाला जमिनदान दिल्याबद्दल विजय वडस्कर यांचा सन्मान या वेळी करण्यात आला.

आनंदवार्ता...

महाराष्ट्र विधान परिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कारासाठी झालेली निवड **म्हणजे मोठाच बहुमान आहे!**

या निवडीबद्दल राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे आभार!

राष्ट्रपती द्रौपदीजी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारणे तर मणिकांचन योगच!!

पुन्हा एकदा धन्यवाद!!!

आमदार श्रीकांत भारतीय

विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य

गणेशोत्सवात दणदणाट करणाऱ्या डिजेवर होणार कडक कारवाई

ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी 'एनजीटी' ची नियमावली जाहीर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ अमरावती

गणेशोत्सवात काळातील दणदणाट आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय बनत आहे. डीजेचा आवाज आणि लेझर शो यामुळे यापूर्वी अनेकांना कर्ण आणि दृष्टी दोषास सामोरे जावे लागले आहे. काहींना हा आवाज सहन न झाल्याने जिवाला मुकावे लागल्याचेही निदर्शनास आले आहे. ही बाब विचारात घेऊन ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने नवीन नियम घालून दिले आहेत. गणेशोत्सवातील ध्वनी प्रदूषणाविषयी श्रवणतज्ज्ञ डॉ. कल्याणी मांडके यांनी केलेली याचिका निकाली काढताना एनजीटीने हे नियम घालून दिले असून, त्यांचे पालन करण्याची जबाबदारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ व पोलिसांवर सोपविली आहे. 'एनजीटी'चे न्यायिक सदस्य दिनेशकुमार सिंग आणि तज्ज्ञ

सदस्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी हा निकाल दिला आहे.

गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियमांचे उल्लंघन झाल्याप्रकरणी श्रवणतज्ज्ञ डॉ. कल्याणी मांडके यांनी ड. मैत्रेय घोरपडे यांच्या माध्यमातून याचिका दाखल केली होती. त्यात राज्य सरकार, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडल, महापालिका आणि पुणेपोलिस यांना प्रतिवादी करण्यात आले होते. पुण्यात गणेशोत्सव काळात होणारे ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती.

काय आहेत नियम?

गणेश मंडळांच्या मांडवात व जवळच्या ठिकाणी आवाजाचे 'रिअल-टाइम' निरीक्षण करावे, मांडवात दोन ठिकाणी डिजिटल डिस्प्ले बोर्डांवर आवाजाची पातळी व मर्यादा नमूद असावी, त्यावर ध्वनिप्रदूषण आरोग्यासाठी हानिकारक असल्याचा वैधानिक इशारा असावा, विसर्जन मिरवणुकीत प्रमुख चौकांमध्ये आवाजाचे रिअल टाइम निरीक्षण करावे, या डिस्प्ले बोर्डांचा खर्च प्रदूषण नियंत्रण मंडळाने करावा, पोलिसांनी प्रदूषण नियंत्रण मंडळासह विचारविनिमय करून गणेश मंडळांना जास्तीत जास्त शंभर वॅट क्षमतेपर्यंत ध्वनी यंत्रणेला परवानगी देण्याचा विचार करावा, गणेश मंडळांनीही ध्वनियंत्रणेची परवानगी मागताना स्पीकर्सची संख्या व क्षमता नमूद करावी. मांडवाचे स्थान व आकारावर आवाजाच्या क्षमतेची मर्यादा शिथिल करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार 'एमसीबी'शी चर्चा केल्यावर पोलिसांना असेल. विसर्जन मिरवणुकीत प्रत्येक मंडळातील ढोल-ताशा-झांज पथकातील सदस्यांची संख्या तीसपेक्षा अधिक नसल्याची खातरजमा पोलिसांनी करावी. विसर्जन मिरवणुकीत टोल व डीजे वाजविण्यास मनाई असल्याची सूचना पोलिस विभाग देईल, तसेच त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल. ध्वनि प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियमावलीचे उल्लंघन झाल्यास पोलिस फौजदारी कायद्यानुसार कारवाई करतील. अनंत चतुर्दशीनंतर सात दिवसांच्या आत उत्सवात ध्वनिप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची नावे 'एमपीसीबी' दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करेल, तसेच अशा प्रकरणांचा तपशील संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. गणेशोत्सवापूर्वी 'एमपीसीबी'ने या सूचना आणि ध्वनी प्रदूषणाच्या हानिकारक परिणामांबाबत व्यापक प्रसिद्धी करावी, अशा सूचनांचा त्यामध्ये समावेश आहे.

जिल्हा परिषदेतर्फे शिक्षक दिनाला होणार आदर्श शिक्षकांचा सन्मान सोहळा

जिल्ह्यातील १४ तालुक्यातील १६ शिक्षकांना केले जाणार सन्मानित

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२ धामणगाव रेल्वे

देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्य सर्वत्र शिक्षक दिन साजरा केला जातो.या निमित्याने जिल्हा परिषद अमरावती तर्फे मातोश्री विमलताई देशमुख सभागृह, शिवाजी नगर अमरावती येथे गुरुवारला (ता.५) दुपारी ३ वाजता सन २०२३ -२४ चा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण होणार आहे. जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांच्या अध्यक्षतेत हा सन्मानसोहळा होणार असून यावेळी जिल्ह्यातील १६ शिक्षकांना आदर्श पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.दरम्यान धामणगाव तालुक्यातून कासारखेडा शाळेचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण चव्हाण यांचा यात समावेश आहे.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषद अमरावती चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोषकुमार जोशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रीती देशमुख , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे, मुख्य लेखा व वित्त

अधिकारी अश्विनी मारणे,सामान्य प्रशासन व पंचायत विभागाचेउपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस,पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुळकर्णी,महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कैलास घोडके,प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने, शिक्षणाधिकारी,माध्यमिक विभागाच्या प्रिया देशमुख,योजना विभागाचे शिक्षणाधिकारी निखील मानकर आदींची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार अंतर्गत दिव्यांग कला क्रीडा संगीत व दिव्यांग विभाग मधून नीलिमा विनोद गरपाल (अमरावती), माध्यमिक शिक्षण विभागातून वीरेंद्र अज्ञानसिंग ब्राह्मण (अमरावती) आदींची निवड झाली असून माधुरी नारायण अमझरे (अमरावती), किरण मनोहरराव साकरकार (अचलपूर), आरिफफुर्रहमान मो. हनीफ (अंजनगाव सुर्जी), पंकज राजेंद्रराव दहीकर(भातकुली), मंजिता सुदामा खार्वे (चांदूर बाजार), राजेंद्र हरिदास वानखेडे (चांदूर रेल्वे), सुनील भूराजी जाणे (चिखलदरा), सुषमा डीसी मोहन (दर्यापूर), श्रीकृष्ण चंदू चव्हाण (धामणगाव रेल्वे), महादेव जयराम राठोड (धारणी), जयश्री रामदास शेकार (मोर्शी), जगदीश वासुदेवराव माहुलकर (नांदगाव खंडेश्वर), प्रमिला भास्कररराव आखरे (तिवसा) प्रेमसुख शंकरराव ठोंबरे (वरुड) आदींची निवड झाली आहे.

शिक्षक दिनाला शिक्षकांचा सन्मान व्हावा म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढाकार घेतल्याने यावर्षी मुहूर्तावर हा सन्मान सोहळा होत आहे. दिनांक ५ सप्टेंबर रोजी आयोजित या शिक्षक सन्मान सोहळ्याला शिक्षक संघटनासह जास्तीत जास्त शिक्षकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक शिक्षणाधिकारी बुद्ध भूषण सोनोने, उपशिक्षणाधिकारी दीपक कोकतारे,अनिल कोल्हे, कार्यक्रम समन्वयक तथा विस्तार अधिकारी मोहम्मद अशपाक यांनी केले आहे.

मेळघाटात ॲम्बुलन्स अभावी बाळासह मातेचा मृत्यू

रुग्णवाहिका वेळेवर न मिळाल्याने गेला जीव

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२मेळघाट

मेळघाटातील कुपोषण,बालमृत्यू आणि मातामृत्यू कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्याचा दावा सरकारकडून करण्यात येत असला तरी, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी होऊ शकलेले नाही. बाल आणि प्र मातामृत्यूच्या घटनेमुळे नेहमीच चर्चेत राहणार्या मेळघाटच्या आरोग्य विभागाचा गलथान कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. गर्भवती महिलेसाठी रुग्णवाहिका वेळेवर न मिळाल्याने अर्भकाचा मृत्यू झाला आणि त्यानंतर मातेचाही मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मेळघाटातील दहेंद्री या गावात घडली आहे. या घटनेने मेळघाटातील आरोग्याच्या सुविधांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

कविता अनिलसाकोम (२०, रा. दहेंद्री) असे मृत विवाहितेचे नाव आहे. कविता हिची शनिवारी दुपारी रुग्णवाहिका न मिळाल्याने घरीच प्रसूती झाली होती. बाळाचापोटातच मृत्यूझाला होता. शासकीय रुग्णवाहिका न मिळाल्याने तिला खाजगी वाहनाने चुर्णी येथीलरुग्णालयात नेण्यात आले होते. त्यानंतर अचलपूरच्या उपजिल्हा रुग्णालयात आणि नंतर अमरावतीच्या जिल्हा सामान्य

रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र रविवारी सकाळी कविता हिचा देखील उपचारादरम्यान मृत्यू झाला. दहेंद्री गावात आरोग्य विभागाने रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली असती तर कदाचित महिलेचाजीव वाचला असता. तीन दिवसांपूर्वी सोनोग्राफीसाठीसुद्धा आरोग्य विभागाने रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली नव्हती, असा आरोप महिलेच्या सासू व पतीने केला आहे. कविता हिचा पती अनिल साकोमने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी माझ्या पत्नीची तब्येत अचानक बिघडली होती. आम्ही रुग्णवाहिकेसाठी फोन केला मात्र रुग्णवाहिका आली नाही. त्यामुळे पत्नीची घरीच प्रसुती झाली. बाळाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मी खासगी गाडी घेऊन पत्नीला चुर्णी येथे रुग्णालयात घेऊन गेलो. तिथून तिला अचलपूर येथे नेले. तेथून डॉक्टरांनी अमरावती येथे हलविण्यास सांगितले, पण तिथे उपचारादरम्यान पत्नीचा मृत्यूझाला. वेळेवर रुग्णवाहिका मिळाली असती, तरतिचे प्राण वाचू शकले असते, असे कविताच्या पतीचे म्हणणे आहे. मेळघाटात गेल्या एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यांत १३ बालमृत्यू, ४ उपजत मृत्यूतर २ मातांचा मृत्यूझाला आहे. चिखलदरा तालुक्यातीलतालुक्यातील जामुननाला येथील एक १ महिन्याच्या बालकाचा त्याच्या आईच्या मृत्यूनंतर २२ दिवसांनी गेल्या २२ ऑगस्ट रोजी चिखलदरायेथील रुग्णालयात मृत्यू झाला. अजूनही मेळघाटातील बालमृत्यूंना आळा घालता आलेला नाही. महिला बाल विकास विभाग आणि आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मेळघाटात काही नावीन्यपूर्ण उपक्रमसुद्धा सुरू आहेत. नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी एक दिवस मेळघाटासाठी हा उपक्रम सुद्धा राबविण्यात आला. तरीही हा प्रश्न सुटलेला नाही.

प्रशांत डवरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शहर जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती

अमरावती महापालिकेचे माजी नगरसेवक प्रशांत डवरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या अमरावती शहर जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. रविवारी वरुड येथे झालेल्या जन सन्मान यात्रे प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा खासदार प्रफुल्लभाई पटेल , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके, आ. देवेंद्र भुयार यांच्या सह पक्षाच्या वरिष्ठ

नेत्यांची उपस्थिती होती. प्रशांत डवरे हे अमरावती शहराच्या राजकारण , समाजकारण तसेच विविध क्षेत्रात सक्रिय असून अमरावती महानगर पालिकेचे माजी नगरसेवक व मनपा सभागृह नेता सुद्धा राहिले आहेत. कुशल नेतृत्व, उत्कृष्ट वत्कृत्व , तसेच विविध कामकाजाची उत्तम जाण असलेले एक प्रतिभावंत व लोकप्रिय व्यक्तिमत्व असून विविध समाज संघटनांशी त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन कॉ-ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष असून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे व्यवस्थापन माजी सदस्य , शिक्षण मंडळ सदस्य म्हणूनही काम केले आहे. तसेच गेल्या काळात अनेक जनआंदोलन करून व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय राहून त्यांनी आपल्या कार्याची छाप निर्माण केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके यांचे अत्यंत विश्वासू व निकटवर्ती म्हून सुद्धा त्यांची विशेष ओळख आहे. आगामी काळातील विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक लक्षात घेता पक्षाने त्यांना शहर-जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली असून सर्वसमावेशक जनतेच्या हितासाठी काम करण्याची संधी दिली आहे.

सेवेमध्ये कर्तव्य धर्म महत्त्वाचा : आ.यशोमती ठाकूर

महाविद्यालयीन कर्मचारी कृतज्ञता व सन्मान सोहळा थाटात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती

सेवेत कार्यरत असताना कर्तव्यनिष्ठ राहून सेवा करणे हाच कर्मचाऱ्यांचा खरा धर्म आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आ. यशोमतीताई ठाकूर यांनी केले. महाविद्यालयीन कर्मचारी कृतज्ञता व सन्मान सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून त्या बोलत होत्या.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परीक्षेत्रिय महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने रविवारी १ सप्टेंबर रोजी श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे कृतज्ञता व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत देशमुख होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. विजय दरणे, विभागीय कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर बारस्कर, जिल्हा सचिव प्रफुल्ल घवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. अमरावती जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून गेल्या वर्षभरा यापूर्वी

सेवानिवृत्त झालेले कर्मचारी तसेच संघटनेसाठी त्यांनी विशेष योगदान दिले अशा सेवानिवृत्त कर्मचारी व पदाधिकारी यांचा आमदार यशोमती ठाकूर व अतिथींच्या हस्ते शाल,सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संघटनेच्या वतीने जवळपास ३० कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना आ. यशोमती ठाकूर म्हणाल्या जो माणूस चांगले काम करतो त्याच्याकडे लोक येत असतात आपल्या कामामुळेच आपला नावलौकिक वाढतो. आज राज्यात अतिशय गंभीर घटना घडत आहे. अशा घटनांना आळा घालण्यासाठी तुमच्यासारख्या कर्मचाऱ्यांनी सजग राहुन आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. सेवानिवृत्ती नंतर आपलं उर्वरित आयुष्य समाजाचं देणं लागतो या नात्याने समर्पित करावं असे आवाहन देखील ठाकूर यांनी केले.महाविद्यालयीन कर्मचारी संघटनेचे विभागीय कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर बारस्कर हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सहकुटुंब आमदार यशोमती ठाकूर यांनी सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव प्रफुल्ल घवळे, संचालन नितीन तसरे तर आभार प्रदर्शन कुंदन राऊत यांनी केले. कार्यक्रमांमध्ये सेवानिवृत्त झालेले कर्मचारी गजानन म्हळसने,रामेश्वर पवाडे,विलास लव्हाळे, कमलेन्द्रप्रसाद तिवारी , गजानन सूर्यवंशी, प्रशांत तायडे, सौ कल्पना चव्हाण, शरद काळमेघ, शशिकला वानखेडे, राम किशोर यादव, धनंजय देशमुख, संतोष घोंगडे, अशोक गव्हाळे, नरेंद्र लोड, राजेंद्र देशमुख, प्रशांत कठाळे, प्रकाश वानखडे, भास्कर वालशिंगे, प्रशांत वळसे, वसंत रुके, प्रदीप म्हसकर , प्रकाश इंगोले, निलेश मानकर, बंडू काटे, साहेबराव सारीशे, विजय पखाले, प्रमोद पाटील, यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता महाविद्यालयीन कर्मचारी संघटनेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

१० तालुक्यात दमदार पाऊस चार तालुके अद्यापही तहानलेलेच : अनेक परिसरातील जलपातळीत वाढ

विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती

पावसाळ्याचे जून ते सप्टेंबर असे १२० दिवस गृहीत धरण्यात येतात. यामध्ये ९० दिवस संपले म्हणजेच, ७५ टक्के पावसाळा आता आटोपला. तरीही जिल्ह्यात पावसाची सरासरी कमी आहे. १० तालुक्यांत पावसाची सरासरी पार झालेली असली, तरी चार तालुक्यांत अद्याप पावसाची

तूट आहे. आता पुन्हा पावसाची रिपरिप सुरू झाल्याने ही तूट भरून येण्याची शक्यता आहे. महावेधच्या माहितीनुसार, जिल्ह्यात १ जून ते ३१ ऑगस्ट या

कालावधीत पावसाची ७०८.५ मिमी सरासरी अपेक्षित असताना प्रत्यक्षात ६७०.९ मिमी पावसाची नोंद झाली आहे ही ९४.७ टक्केवारी आहे. मागच्या वर्षी

याच तारखेला ४२८,४ मिमी पाऊस झाला होता व ही ६०.५ टक्केवारी होती. त्यातुलनेत यावर्षी समाधानकारक पाऊस झालेला आहे. सतत दोन महिन्यांपासून हलका ते मध्यम पाऊस होत असल्याने भूजलाचे पुनर्भरणदेखील झाल्याने भूजलस्तरात वाढ झालेली आहे. जमिनीत आर्द्रता असल्याने रब्बी हंगामासाठी दिलासा मिळाला आहे.सद्यस्थितीत धारणी ८४.४ टक्के, अमरावती ८४.२, भातकुली ८३.७ व अचलपूर तालुक्यात सरासरीच्या ८९ टक्केच पावसाची नोंद झालेली आहे. याशिवाय उर्वरित १० तालुक्यात पावसाने सरासरी पार केल्याने दिलासा मिळाला आहे.

रोही व रानडुकराने पिकांचे नुकसान केल्यास करा अर्ज सादर

.....तर २४ तासांत मिळणार ठार मारण्याची परवानगी

विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती

रोही व रानडुकराने शेतमालाचे नुकसान केल्यास वनविभागाकडून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जाते. परंतु रोही व रानडुकराचा कायमचा बंदोबस्त करता येत नव्हता. तसेच वनविभागाच्या अधिकाऱ्यांना प्राण्यांना मारण्याचे अधिकार नव्हते.

परंतु राज्याच्या महसूल व वनविभागाकडून रोही व रानडुकरांकडून शेतमालाचे नुकसान झाल्यास व शेतकऱ्यांनी अर्ज केल्यास त्यांना ठार मारण्याकरिता २४ तासांच्या आत परवानगी दिली जाणार आहे.यापूर्वी बंदुकीद्वारे शिकार करण्याकरिता अनुभवी व्यक्ती मिळत नव्हती. रोही व रानडुक्कर ठार झाल्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्याचा खर्च शेतकऱ्यांना करावा लागत होता. वनपरिक्षेत्र अधिकारी यांना वन्यप्राणी विल्हेवाट करण्याबाबत अधिकार नव्हते. त्यामुळे ठार करण्याची सदर कार्यपद्धती व्यवहारी ठरत नसल्याचे वनविभागाच्या लक्षात आले. त्यामुळे त्यात नुकतीच सुधारणा करण्यात आली. रानडुक्कर किंवा रोही या वन्यप्राण्याने शेतातील पिकांचे नुकसान केले. याबाबत शेतकऱ्याने संबंधित वनक्षेत्रपालांकडे लेखी स्वरूपात अर्ज देऊन त्याची पोचपावती घ्यावी लागणार आहे. तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित वनक्षेत्रपाल शहानिशा करत शेतमालाचे नुकसान करणाऱ्या रोही व रानडुकराला मारण्याकरिता २४ तासांच्या आत परवानगी देणार आहे जर २४ तासांच्या

आत परवानगी दिली नाही किंवा नाकारली नाही तर अर्जदाराला परवाना दिला, असे गृहीत धरले जाणार आहे.

संरक्षित जंगलात मात्र परवानगी नाही

राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य, व्याघ्र प्रकल्प, संबंधित राखीव क्षेत्रात मात्र कोणत्याही वन्यप्राण्यांना मारण्याची परवानगी दिली जाणार नाही. अभयारण्य राष्ट्रीय उद्यान सीमेपासून पाच किलोमीटर सभोवतालच्या क्षेत्रात या तरतुदीचा वापर करताना – अधिक काळजी घेतली जाणार आहे. ठार करण्याच्या परवानगीसाठी लागणारा व्यावहारिक कालावधी व क्षेत्र याचा तपशील नमूद करण्यात येईल. परवानाधारकाने त्याचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. प्रत्येक महिन्यात देण्यात आलेले परवाने, त्यानुसार ठार करण्यात आलेले रोही व रानडुक्कर यांच्या संख्येबाबत विल्हेवाट तपशील, मासिक अहवाल वनक्षेत्रपाल संबंधित उपवन संरक्षकाकडे देणार आहेत. यामुळे वन्यप्राण्यांकडून शेतातील – पिकांची नासाडी होणार नाही, असे मानले जात आहे.

फवारणी करताय? हातमोजे, चष्मा, टोपी वापरा; कृषी विभागाने शेतकऱ्यांना दिला सल्ला : खबरदारी घेऊनच फवारणी करा

अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती

खरीप हंगामातील सोयाबीन,कापूस, व इतर पिकांवर कीटकनाशकाची फवारणी करताना खबरदारी बाळगणे आवश्यक आहे. नाही तर जीविताला धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कीटकनाशकाची फवारणी करताना शेतकऱ्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून हातमोजे, चष्मा अन् टोपीचा वापर करावा, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. सर्वसाधारणपणे पाने, फुले, फळे खाणाऱ्या अळ्यांच्या व्यवस्थापनासाठी उदर विष आणि रसशोषक किडीच्या व्यवस्थापनाकरिता आंतरप्रवाही आणि जमिनीत वास्तव्य करणाऱ्या किडीच्या व्यवस्थापनासाठी धुरीजन्य किंवा जमिनीतून द्यावयाच्या कीटकनाशकांची निवड करणे अधिक फायदेशीर ठरते.

फवारणीसाठी सर्वप्रथम

हे लक्षात ठेवा...

खाद्य पदार्थ, औषधे व कीटकना- शकांचा संपर्क येऊ देऊ नये. कीटकनाशके लहान मुलांच्या संपर्कात येणार नाही, अशा ठिकाणी कुलूपबंद ठेवावीत. पीक, कीड व रोगनिहाय कीटकना- शकांची निवड करून प्रमाणातच फवारणी करावी. कीटकनाशक वापरण्यापूर्वी लेबल व माहिती- पत्रक व्यवस्थित वाचून त्यावर दिलेल्या खबरदारीच्या सर्व सूचनांचे पालन करावे. तणनाशके फवारणीसाठी वापरलेला पंप चुकूनही कीटकनाशकांच्या फवार- णीसाठी वापरू नये. गळक्या फवारणी पंपाचा वापर फवार- णीसाठी करू नये. कीटकनाशक हाताळताना व फवारणी करताना अंगरक्षक कपडे, हातमोजे, चष्मा, मास्क, टोपी, गमबुट इ. चा वापर करावा व संपूर्ण शरीर झाकले जाईल याची काळजी घ्यावी.

एकात्मिक कीड व्यवस्थापनात किडीची संख्या नुकसान पातळीच्या खाली ठेवण्यासाठी रासायनिक कीटकनाशकाचा महत्त्वाचा वाटा आहे. मात्र, ही कीटकनाशके विषारी असून, हाताळणी व फवारणी करताना शेतकऱ्यांनी पूर्ण खबरदारी घेणे गरजेचे आहे.

– कृषी अधिकारी.

कीटकनाशके खरेदीत घ्यावयाची काळजी

कीटकनाशके परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावीत. खरेदी केलेल्या कीटकनाशकांचे विक्रेत्याकडून पक्के बिल घ्यावे. लेबल क्लेम आणि शिफारस असलेले कीटकनाशक फवारणीसाठी आवश्यक तेवढ्याच प्रमाणात खरेदी करावीत. कीटकनाशके खरेदी करताना माहिती (लिफलेट) पत्रकाची मागणी विक्रेत्याकडे करावी.

मवाळ कीटकनाशकांची म्हणजेच ज्या कीटकनाशकाच्या डब्यावर हिरवा किंवा निळा त्रिकोण आहे, अशाच कीटकनाशकाची निवड करावी. त्यानंतर गरज भासल्यास शेवटी जहाल (लाल, केशरी, पिवळा त्रिकोण असलेली) कीटकनाशके वापरावीत.एकच एक किंवा एकाच गटातील एकच एक गटातील कीटकनाशकांची वारंवार फवारणी करू नये, असे कृषी विभागाने म्हटले आहे.

उत्सव तोंडावर पण... शिध्याचा 'आनंद' फक्त रव्यापुरताच; चार पाच दिवसात आनंदाचा शिधा होणार वाटप

विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती

येत्या ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून, १० सप्टेंबर रोजी गौरींचे आगमन होणार आहे. गौरी-गणपतीचा हा सण बघून राज्य शासनाने रेशनातून लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, पुरवठादाराकडून जिल्ह्याला आतापर्यंत फक्त रवाच पाठविण्यात आला आहे अशी माहिती आहे. तर उर्वरित चार जिन्नस अद्याप मिळाल्या नसून यासाठी आणखी चार-पाच दिवस लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा कधी हाती येणार याबाबत सांगणे जरा कठीणच आहे.

भाजप-शिंद गट शिवसेनेचे राज्यात सरकार आल्यानंतर या सरकारने गोरगरिबांच्या घरातही ण-उत्सवात गोडधोड तयार करता यावे यासाठी नंदाचा शिधा वाटपाचा निर्णय घेतला होता. तेव्हापासून राज्य शासनाकडून सण-उत्सवात आनंदाचा शिधा रेशन लाभार्थ्यांना पुरविला जात आहे.

आता ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून, १० सप्टेंबर रोजी गौरींचे आगमन होणार आहे. अशात रेशन लाभार्थ्यांना परत एकदा आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. ५ प्रकारच्या जिन्नस असलेला हा आनंदाचा शिधा रेशन लाभार्थ्यांना रेशन दुकानांतून वाटप केला जातो. मात्र आता सप्टेंबर महिना सुरू झाला असूनही आनंदाच्या शिधामधील सर्व जिन्नस जिल्ह्याला मिळालेल्या नाहीत शिधामधील रवाच जिल्ह्याला मिळाला आहे, तर उर्वरित जिन्नससाठी आणखी चार-पाच दिवसांची वाट बघावी लागणार असल्याची माहिती मिळाली. यामुळे या जिन्नस मिळणार कधी व आनंदाच शिधा वाटप होणार कधी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

'पीओपी'ला बंदी; मूर्ती बाजारात उपलब्ध, नेमकी मूर्ती बसवायची कोणती? नागरिकांमध्ये संभ्रम

विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती

गणेशोत्सव अवघ्या सात दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे गणेशभक्तांमध्ये लगबग सुरू झाली आहे. सार्वजनिक मंडळांसह घरोघरी या उत्सवाची तयारी सुरू आहे. अशातच सार्वजनिक मंडपात पीओपीची मूर्ती बसवू देऊ नये, असे निर्देश उच्च न्यायालयाने महापालिकांना दिले आणि मंडळांच्या कार्यकर्त्यांसह भाविकांना प्रश्न पडला की, नेमकी मूर्ती बसवायची कोणती? त्याशिवाय जवळपास सर्वच मंडळांनी आधीच मूर्ती बूक केल्या आहेत. त्यांनी काय करायचे? पुण्यात मोठी मंडळे कायमस्वरूपी मूर्ती बसवत असल्याने हा निर्णय मुंबईसाठी लागू होऊ शकतो, अशीही चर्चा

मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये होत आहे. स्पष्ट निर्देश नसल्याने मूर्ती कोणती बसवायची? असा संभ्रम निर्माण झाला आहे.

दरम्यान, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेशमूर्तींवर बंदी घालण्यात आलेली नाही; पण सार्वजनिक मंडपामध्ये पीओपीची मूर्ती बसवू नये, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने दिले आहेत, तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याच्या सूचना न्यायालयाने दिल्या आहेत.

पीओपीच्या मूर्तींना बंदी नाही; पण सार्वजनिक मंडपात त्या बसवायच्या नाहीत, असे जाहीर करण्यात आल्याने नागरिक संभ्रमात आहेत. २०२० मध्ये पीओपी गणेशमूर्तींवर बंदीबाबतचा आदेश दिला. मात्र, अद्याप त्याची अंमलबजावणी होत नाही. न्यायालयाने यावर नाराजी व्यक्त केली. राज्य सरकारकडूनदेखील दरवर्षी पीओपी गणेशमूर्तींवर बंदीची भूमिका घेतली जाते; पण प्रत्यक्षात अंमलबजावणी केली जात नाही. 'पीओपी'बाबत पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने प्रदूषण नियंत्रण मंडळाने जी नियमावली तयार केली, त्याचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना उच्च न्यायालयाने दिल्या आहेत, तसेच गणेश मंडळांना परवानगी देताना पीओपी बंदीची अट घालणे आवश्यक असल्याचे निर्देश न्यायालयाने महापालिकांना दिले आहेत.

तिकीट घोटाळ्यानंतर आता विद्यार्थी पासेस घोटाळा





विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती

शासनाच्या वतीने महिला, ६० वर्षावरील वयोवृद्ध यांना प्रवासामध्ये ५० टक्के सुट तसेच ७५ वर्षावरील वयोवृद्धांना १०० टक्के सवलतीच्या दरात प्रवासाची एसटी महामंडळाच्या वतीने मुभा देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शाळकरी मुला व मुलींना विविध योजनेअंतर्गत एसटी महामंडळाच्या वतीने त्यांच्याच शाळेतून एसटी बस पासेसची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र याच संधीचा लाभ घेत तालुका स्तरावर शाळकरी मुला मुलींना एसटी बस की ड्युप्लीकेट पास देऊन त्यांना 'लालपरी' ने प्रवासाची मुभा देण्यात येत आहे.

एसटी महामंडळाच्या अमरावती विभागातंर्गत तब्बल एक वर्षापूर्वी २५ वर्षाआधी झालेला तिकीट घोटाळा उघडकीस आला होता. ज्यामध्ये १६ अधिकारी व कर्मचाजयांना कारवाईच्या यादीत समाविष्ट करण्यात आले. मात्र अधिकाजयांच्या मर्जीतील ५ अधिकारी-कर्मचाजयांवर कुठलीही कार्रवाई न करता केवळ ११ अधिकारी व कर्मचाजयांना धारेवर धरण्यात आले होते. आता पुन्हा एकदा एसटी महामंडल 'खोटी विद्यार्थी पास' चा घोटाळा उघडकीस आला आहे. यामध्ये एसटी महामंडळाचे काही कर्मचारी सहभागी असल्याचे समोर येत आहे. शाळकरी मुलांना एसटी महामंडळाद्वारे देण्यात येणारी पास हुबेहुब छापून दिली जात आहे. ज्याद्वारे शाळकरी मुले प्रवास करतांना दिसून येत आये. यावर्षी देण्यात आलेल्या विद्यार्थी पासेस मध्ये केवल २ महिन्यात हा घोळ उघडकीस आला आहे. या संदर्भात एसटी महामंडळाचे विभागीय नियंत्रक निलेश बेलसरे यांच्या दालनात शनिवार २४ ऑगस्ट रोजी तात्काळ बैठक देखील घेण्यात आली. यामध्ये जिल्ह्यातील ८ डेपो चे मैनेजर तसेच पासेस के काम सांभाळणारे कर्मचारी यांचा समावेश होता. विशेष म्हणजे यापूर्वी एसटी महामंडळच्या मोझरी बस स्थानक येथे काम करणाजया एका कर्मचाजयाने याच प्रकारे खोट्या पासेस तयार करुन विद्यार्थ्यांना वाटप केले होते त्या प्रकरणी दोषी कर्मचाजयाला केवल मुख्यालयी अटॅच करण्यात आले मात्र कुठलीही कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नव्हती, अशी माहिती सूत्रांकडून प्राप्त झालेली आहे. आता पुन्हा एकदा पासेस घोटाळा समोर आल्याने या विषयाला उधान आले आहे मात्र पासेस घोटाळ्यावर येथील अधिकारी पांघरुन घालण्याचा प्रयत्न करीत असल्याचे देखील समजते.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते वॉर रूमचे उद्घाटन

खा.अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभेची जोरदार तयारी

विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने जोरदार तयारी सुरू आहे. अमरावती जिल्ह्यात न भूतो न भविष्यती यश गाठण्याचा संकल्प भाजपने केला आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते अमरावती ग्रामीण भाजपच्या सुसज्ज अशा जिल्हा वॉर रूमचे उद्घाटन रविवारी (ता.०२) करण्यात आले आहे.

आगामी विधानसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ही वॉर रूम कार्यान्वित करण्यात आली आहे. शासनाच्या योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे, पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक यांच्यामध्ये योग्य तो समन्वय राखणे, पक्षाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनाचे विविध माध्यमांमधून जास्तीत जास्त पद्धतीने प्रचार-प्रसार करणे यासह विविध बाबींचा अभ्यास करण्यासाठी व शास्त्रशुद्ध पद्धतीने नागरिकांपर्यंत योग्य माहिती पोहोचवण्यासाठी

भाजपने कंबर कसली आहे. त्याच क्रमात भाजपने सुसज्ज वॉर रूम स्थापन केली असून या रूमच्या माध्यमातून प्रचार प्रसारणाशी संबंधित विविध बाबींचे कामकाज चालणार आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या वॉर रूमची माहिती खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी ना. बावनकुळे यांना दिली. तर वॉर रूममध्ये समन्वय ठेवण्यासाठी सुनील सोमवंशी यांची नियुक्ती देखील वॉर रूम प्रमुख म्हणून करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत धीरज चौधरी, ऋषिकेश दुर्गे, गिरीश काळे, यश गवई, वैदही उपासने, संगीता गायकवाड, रवीकिरण वाघमारे, शंतनू बांबल आदी तज्ञांची टीम कामकाज पाहणार आहे. नागरिकांपर्यंत योग्य, वस्तुनिष्ठ विश्वासहार्य माहिती पोहोचवण्यासाठी याचा चांगला उपयोग होईल, असे भाजपने कळविले आहे.

युवा स्वाभिमानच्या विदर्भ स्तरीय दहीहंडीत युवकांचा जल्लोष .....

रविवारी नवाथे चौकात युवा स्वाभिमानच्या विदर्भ स्तरीय दहीहंडीच आयोजन करण्यात आले होते या दहीहंडीला सकाळपासूनच अमरावतीकरांनी प्रचंड असा प्रतिसाद दिला दुपार नंतर या दहिहंडीमध्ये सिनेकलाकार चंकी पांडे,तुषार कपूर,शरद केळकर यांचे आगमन झाल्याने दहीहंडीचा उत्साह अधिकच वाढला.डाय आणि ढोलताशाच्या तालावर तरुणाई थिरकत होती त्यात पावसाच्या सरीवर श्री बरसत असल्याने दहीहंडी परिसरात जल्लोषपूर्ण वातावरण होते. रात्री उशिरा शिवतांडव शिरजगाव या पथकाने दहीहंडी फोडत प्रथम क्रमांक पटकविला ..